## 'साखरफेरा' या कादंबरीतील शेतीसमस्येचे स्वरूप व त्यांची चिकित्सा

१) आर्थिक समस्या

२) सहकार

३) शेतकरी संघटना

४) ऊसपीक प्रगती

५) ऊसदर प्रश्न

६) साखर कारखान्याची अवस्था

७) भ्रष्टाचार

८) व्यसनाधिनता

९) अंधश्रद्धा

ऊस हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे नगदी पीक आहे. महाराष्ट्रातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात राज्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात या पिकाचा वाटा मोलाचा आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे ऊस पिकास पोषक हवामान महाराष्ट्रात आहे. ऊसामुळेच साखर उत्पादनात देशाला अग्रेसर स्थान आहे. साखर उद्योगामुळे देशाच्या आर्थिक सुबत्तेत भर पडली आहे.

ऊस हे खुप वर्षापासून चालत आलेले पीक आहे. दिवसेंदिवस या पीकात प्रगती होत चालली आहे. पूर्वी ऊसाला म्हणावे इतके महत्त्व नव्हते. इतर पिकांसारखेच हे पीक होते. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. शेतकरी ऊसाशिवाय दुसरे पीक घ्यायला तयार नाहीत. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काही वर्षातच सहकारी साखर कारखाने निर्माण करण्यात आले. त्यातील पहिला कारखाना विखे पाटील यांनी लोणी, प्रवरानगर येथे काढला. या नेत्यांनी शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या सहकारी संस्था जीवाचे रान करून उभारल्या, सुरूवातीला दहा-पंधरा वर्ष या संस्था उत्तम पद्धतीने चालेल्या. परंतु कालांतराने संस्थांचा कारभार हळूहळू चुकीच्या मार्गांनी केला जावू लागला. आजच्या काळात काही मोजके कारखाने सोडले तर इतर सर्व कारखाने भ्रष्टाचाराचे अड्डे झालेत. मनमानी कारभार चालला आहे. त्यांना विरोध तर कोण करणार. केला तर एकट्या-दुकट्याने करून चालणार नाही. त्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित होऊन त्यांना खुर्च्या रिकाम्या करून आपल्या हक्काला आपणच न्याय मिळवून घेतला पाहिजे. कारण त्या नेत्यांनी त्या कारखान्यांवरती आपले वर्चस्व, सत्ता, इतके प्रबळ केले आहेत. त्यामुळे सर्व लोक त्यांच्या ताटाखालचे मांजर होऊन नंदिबैलासारखे माना डोलवत राहतात.

मध्यंतरीच्या काळात भरपूर पैसे मिळवून देणारे विना कटकटीचे ऊसाचे पीक होते. परंतु कालांतराने त्याचाही बागुलबुवा झाला. त्यालाही काही लोकांनी रसातळाला नेऊन पोहचवले. शेतकरी आर्थिक दृष्ट्या खुप खचला. त्याच्या मनात करण्याची जिद्द, कष्ट करण्याची ताकद असताना भांडवला अभावी ऊस पीक तो घेऊ शकत नव्हता. यावर उपाययोजना म्हणून तसेच ऊसाचे उत्पादन वाढावे म्हणून कारखान्याने एवढे एकच काम चांगले केले ते म्हणजे ऊस पिकाच्या लागणीसाठी योजना जाहीर केली. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस लागण करून कष्ट करून ऊसाचे विक्रमी उत्पादन काढले. आता तो घालवायचा तर कारखाना प्रशासनाच्या मिंत्या करून ऊस तोड

आणायची. नंबरने घालवायचा तर खूप वेळ लागतो. तोडकऱ्यांना पैसे, दारू, मटण देऊन तो तोडून घ्यायचा. शेतकरी आपल्या जावयाचे आदरातिथ्य करत नसतील एवढी उठाठेव त्या तोडकऱ्यांची करावी लागते. कारखानाही ऊसाला घातलेल्या भांडवलाच्या तुलनेत दर देत नाही. कारखान्याला योग्य वाटेल त्या पद्धतीनेच दर देतात. म्हणजे कारखाना प्रशासन त्यांचा फायदा तोटा पहाते. शेतकऱ्यांचा फायदा तोटा कोण पहाणार? त्यासाठी शेतकऱ्यांनी कोणाचीही वाट न पहाता संघटित झाले पाहिजे. तरच सर्व सत्ताधिकारी घाबरतील इतरांसारख्या तुमच्या मागण्या मान्य होतील. चातक पक्षी ज्याप्रमाणे पाऊसाच्या एका थेंबासाठी वर्षभर वाट पहात असतो तसे शेतकऱ्यांना वर्षानुवर्ष दर वाढण्याची वाट पहावी लागणार नाही. संघटनेमुळे सर्व यंत्रणा हलू शकेल. व शेतकरी सुखी होईल. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे कारखाना प्रशासनाचे, सहकारातील भ्रष्ट व्यवहाराचे, ऊस लागणीचे, शेतकऱ्यांच्या विषयी समाजव्यवस्थेचे निर्णय, मोहन पाटील यांनी अतिशय परखड समर्पक शद्वात वास्तव पद्धतीने 'साखरफेरा' मध्ये शद्वबद्ध केले आहे. या घटकांची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

**१) आर्थिक समस्या :-**

देशाच्या अर्थव्यवस्थेत शेतीला खुप महत्व असून ७०% लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. देशातील सर्व उद्योगधंद्याना लागणारा कच्चा माल शेतीतूनच मिळतो. या कच्च्यामालापासून पक्का माल तयार करणारे व्यावसायिक कोट्यावधी रूपयांचे मालक झालेत परंतु आमचा शेतकरी मात्र आहे तिथेच आहे. आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करताना देशाची स्थिती काय आहे. मोजकेच लोक यशाच्या उंच शिखरावरती जाऊन बसलेत. आणि बाकीचे दारिद्र्याच्या गर्ततेत पिचत पडलेत माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम २०२० च्या समृद्ध भारताचे स्वप्न पहात आहेत आणि दुसरीकडे कृषिप्रधान अर्थव्यवस्थेचा कणा असलेला बळीराजा मात्र आत्महत्येच्या विळख्यात सापडला आहे. याला कसली प्रगती म्हणावयाची हेच कळत नाही. सापडला आहे तर मग देशाची प्रगती कशी होणार. दिवसेंदिवस शेतकऱ्यांची आर्थिक सुबत्ता सुधारण्याऐवजी खालावू लागली आहे. त्यामुळे महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यात शेतकरी आत्महत्या करतात ही खरोखर खेदाची, दुःखाची बाब

आहे. खरा शेतकरी पिढ्यान् पिढ्या दारिद्र्यात खितपत आहे. शेतकऱ्यांचा विकास झाल्याशिवाय भारताच्या विकासाला अर्थ नाही.

मोहन पाटलांनी 'साखरफेरा' मध्ये वर्णिलेल्या शेतकऱ्याची परिस्थिती अतिशय बिकट आहे. मनात कष्ट करण्याची जिद्द असूनही भांडवलाअभावी शेतकरी काहीही करू शकत नाही. शेतकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल होण्यास अनेक घटक जबाबदार आहेत. जिथे जाईल तिथे प्रत्येकाने शेतकऱ्याला फसविण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई म्हणून सरकार पॅकेज देते. अथवा शेतकऱ्यांचे कर्ज माफ करून सातबारावरील बोजा कमी करते. असे सरकारने न करता. ज्या गोष्टींमुळे शेतकऱ्याला तोटा सहन करावा लागतो. त्यावर कायमचा बंदोबस्त करून शेतकऱ्याच्या मालाला योग्य दर मिळवून दिला पाहिजे. म्हणजे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सबल होईल. कोणाकडे त्याला हात पसरावे लागणार नाहीत. किशानेही स्वतःची आर्थिक परिस्थिती नसताना इकडचे-तिकडचे पैसे गोळा करून ऊसाची लागण केली होती. किशाचं दुर्दैवच म्हणायचं. दोन दिवसात ऊसाला तोड येणार होती. परंतु आदल्याच दिवशी त्याच्या फडाला भर उन्हाची आग लागली. का कोणी लावली काहीच कळले नाही. हे दृश्य पाहून किशा हतबल झाला. काय करावे हे त्याला सुचेना. जीवापाड कष्ट करून आणलेल्या पिकावरती किशाची किती आशा होती. परंतु सर्व धुळीला मिळाले. कर्ज भागून इतर खर्चासाठी त्याला पैसे शिल्लक राहणार होते. झाले मात्र उलटेच. फडाला आग लागल्यामुळे सर्व नियोजन फिस्कटले. आता जळक्या ऊसाचे पैसे किती येणार त्यातून साधी बँकही भागत नाही. जे दोन सव्वादोन हजार हातात पडतील ते खर्चाला तरी होतील या आशेवरती तो बसला. कर्ज थकबाकीत राहणार. त्याला काही पर्याय नव्हता. नवीन लावण करण्यासाठी पैसे कोठून आणायचे या काळजीने त्याच्या जीवाची घालमेल होत होती. शेतकरी कर्जबाजारी कशामुळे झाला.

या संदर्भात चवरे आर. व्ही. म्हणतात, ''भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी अर्थव्यवस्थेचा पाया असून शेतीवरच देशाची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. कृषिप्रधान देश म्हणून अभिमानाने उल्लेख केलेला असला तरी आज शेती व्यवसायाला आत्महत्येचे ग्रहण लागलेले आहे. शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो आणि कर्जातच मृत्यू पावतो. शेतकऱ्यांना बोगस बियाण्यांचा

आणि रासायनिक खताच्या कृत्रिम टंचाईचा सामना करावा लागत आहे. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. हेच शेतकऱ्यांच्या कर्ज बाजारीपणाचे मूळ कारण आहे.''[१]

किशा एकदा गणपा न्हाव्याच्या दुकानात बसायला गेला होता. तिथे त्या दोघांमध्ये बोलणे चाललेले तेव्हा किशा गणपाला म्हणे, ''तुजं बरं हाय रं, गणपा. तुजा धंदा हाय, हातात कला हाय. पोटाचं साधन हाय. कुठंबी मुलखावर जाऊन दाढीला साबण लावत बसचील. तर तुझं पॉट भरंल. खरं माझ्या सारख्या शेतकऱ्यानं काय कराव? का म्या बी रानमाळ सोडून तुज्या मागनं हिडावं? सांग की कुठं जावावं?''[२] असे किशा कळवळून बोलला. किशाचे बोलणे गणपाच्या काळजाला घर करून गेले. गणपाला किशाचे बोलणे पटले. शेतकऱ्यांच्या खिशात पैसे आले तर दाढी करतील त्यामुळे गणपाचा व्यवसाय चालेल त्याच्या हातात चार पैसे येतील. म्हणजे कुठेजरी गेले तरी शेतकऱ्यांच्या शिवाय कोणाचे काही चालत नाही. गणपाचा व्यवसाय असल्यामुळे त्याला दिवसाचे पाच पंचवीस तरी मिळतात. शेतकऱ्यांचे मात्र तसे नाही या वर्षाचे ते पुढच्या वर्षीच पैसे येतात. कर्जाचा डोंगर वर्षभर वागवायचाच. यंदाचा किशाचा ऊस तर जळलाच. घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे कर्जाच्या व्याजाचा काटा काही केले तरी थांबत नाही. रक्कम वाढतच रहाते. पुन्हा ऊस लागण केली तर सर्व पैसे कर्जातच जाणार. मग वर्षभर पोटात काय बिब्बं भरायचे. इतके वाईट दिवस शेतकऱ्यांच्या वाट्याला येतात. कारण शेतीशिवाय दुसरे कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन त्याच्याकडे नाही.

किशाच्या मते पुढच्या वर्षी उत्पन्नाची वाट बघत जर कर्ज भरले नाही तर कर्जाच्या रक्कमेत दिवसेंदिवस वाढ होत जाणार. यापेक्षा यंदाच काहीतरी करून कर्ज भरले पाहिजे. या संदर्भात प्रा. डॉ. सुरेश साळुंखे म्हणतात, ''शेवटी मुलांपेक्षाही अधिक प्रेम असणाऱ्या आपल्या मुक्या जनावरांची अथवा काळ्या आईची विक्री त्याला करावी लागते. त्यातच निसर्गाचा लहरीपणा, अतिवृष्टी, भयानक दुष्काळ, हिमवृष्टी अथवा रोगराईमुळे त्याचे आर्थिक नियोजन पूर्णपणे ढासळून जाते.''[३]

यापेक्षा किशाने जळक्या ऊसाचे बिल आल्यानंतर गोठ्यातील गाय म्हैस ही जनावरे विकून आलेल्या पैशातून बँक भरायची ठरवले. तो जनावरांचे कासरे सोडायला गेला तसे त्याची बायको बायजा म्हशीच्या गळ्यात पडून रडू लागली. मुलगा विकासही तोंड वाकडं करून बसला. पोटच्या मुलाबाळाप्रमाणे वाढविलेली काळजी घेतलेली जनावरे अशी विकायची हे पाहून किशालाही खूप

वाईट वाटले. परंतु त्याने या सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष केले. यासंदर्भात नागनाथ कोतापल्ले यांनी हरिभाऊंच्या 'काळा तर मोठा कठिण आला' या दिर्घकथेतून रामजीबाबाचे आणि त्याच्या बायकोचे त्यांच्या बैलांवर किती प्रेम होते हे समर्पक शद्वात मांडण्याचा प्रयत्न केला आहे, ''बैल विकायची वेळ आली तर कसायाकडे ती जाता कामा नयेत. याची काळजी रामजीबाबा घेऊ पाहतो. परंतु शेवटी ती कत्तलखान्याकडेच जाताना दिसतात. तेव्हा बैल विकून आलेले धान्य रामजीबाबाला बैलाच्या रक्तात भिजल्यासारखे वाटते. आणि तो मुंडाशाच्या पदरी बांधलेला रूपया मुंडासे जाळीत जाऊन डोक्याला भाजीत आहेसे वाटू लागले.''[४] यातून शेतकऱ्यांचे आपल्या जनावरांवरती किती प्रेम असते याचा प्रत्यय येतो. त्या जनावरांचे आणि शेतकऱ्यांचे ऋणानुबंध इतके जुळलेले असतात कि त्यांना वैरण पाणी केल्याशिवाय शेतकरी कधी जेवायला बसत नाही. ती आजारी पडली तरी शेतकऱ्यांच्या जीवाची घालमेल होत अस्ते. अशा जनावरांना जर कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याला विकावे लागत असेल तर त्यापेक्षा दुर्दैवी दुसरा कोणी नाही. तो जर भावनात्मक झाला असता तर कर्ज फिटणार नव्हते. तरीही थोडेसे कर्ज राहिलेच. सगळे पैसे संपवून पुन्हा खर्चाला काय म्हणायचे. ऊस लावला तरी बारा–तेरा महिन्यानी जाणार. पुन्हा एक महिन्यानी बिल येणार. वर्षभर व्याज वाढत राहणार. त्यापेक्षा एकदाचा बाजार उरकून पैसे भरलेले बरे. वर्षभर तरी कर्जाची काळजी नाही. आर्थिक समस्येपुढे कोणाचे काहीही चालत नाही. पैसा असल्यावरती कोणाला बोलावे लागत नाही. आपोआप जमा होतात. तेच जर एखादा संकटात असेल. आपल्यापाठीमागे काहीतरी लागेल म्हणून कोणी त्यांच्याकडे वाकूनही पहात नाही. अशी आजच्या लोकांची अवस्था झाली आहे. पूर्वीसारखी जीवाला जीव देणारी माणसं आता राहिली नाहीत. किशाने कर्ज फेडण्यासाठी जनावरे विकली हे शामाला कळताच तो धावत किशाकडे आला. कारण तो त्याचा जवळचा मित्र होता. पण तो येऊन तरी काय करणार होता. त्याला स्वतःचाच संसाराचा गाडा ओढणे डोईजड झालेले तो किशाचा कर्जाचा डोंगर काय बाजूला सरकवणार होता.

किशाला आणि त्याच्या भावाला गजाला दोघांनाही दोन एकर जमीन होती. परंतु दोघांच्याही राहण्यात, वागण्यात, जमीन आस्मानाचे अंतर होते. गजा हा श्रीमंत होता. त्याच्याकडे गाडी, स्लॅपचे घर, दागदागिने, घरापाठीमागच्या गोठ्यात हत्तीच्या पिल्लासारख्या जर्सी गाई, व्याजानेही तो पैसे देत



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

होता. हे सर्व वैभव पाहून किशा खूप दुःखी होत होता. आपणही असे श्रीमंत कधी होणार ही वेदना त्याच्या हृदयाला पीळ पाडत होती. या गोष्टींवरती विचार केल्यानंतर त्याच्या लक्षात आले की गजा हा वाटणी झाल्यापासून दरवर्षी ऊसाचे पिकच घेतोय. त्यामुळे त्याच्याकडे पैसे शिल्लक आहेत. कारण ऊसाचे पैसे एक रकमी येतात. त्यामुळे कोणतेही काम पटकन होत असे.

नंतर किशाची नजर आपल्या वेड्यावाकड्या अंगणाकडे फिरायची ते अंगण बघून त्याच्या कपाळावर आठ्या चढायच्या, उठून कमरेवरती हात ठेवून तो आपल्याच जुन्या मातीच्या घराकडे पहात रहायचा. घराचे मधले आडे कंबरेतच कुचलेले. तिथे कौल गोळा झालेली. पावसाळ्यात आढ्यातनं सोप्यात धार लागते. तरी पत्र्याचा आधार घेऊन गळती काढलेली. पोपडे धरलेल्या मातीच्या भिंती पाऊस खाऊन विरत चाललेल्या. मागे परड्यात गोठ्यावरचा पत्रा गंजून शेवयाच्या ताटा सारखा जाळीदार झालेला. गोठ्यात घुशीने अकरलेली जमीन. जागो जागी पांढऱ्या मातीचा ढिग सार घरच गंजकं घरात घाण्याच्या बैलागत फिरणारी बायको बायजा आणि एक मुलगा विकास असा फाटका न जोडता येण्यासारखा किशाचा संसार होता. अशा फाटक्या परिस्थितीचा विचार करून किशाच डोकं चरकात घातलेल्या ऊसागत पिचून निघायचं. आपल्या पाचवीला पुजलेल्या अठरा विश्वे दारिद्र्याने पिळवटून निघायचा.

गजा खोतासारखे श्रीमंत व्हायचे असेल तर आपल्यालाही ऊस लावण केली पाहिजे. पण लावण करायचे म्हटले तर रान नांगरायचे, सऱ्या सोडायच्या, वाकुरे करायचे, रान तयार करायला दोन हजाराच्या वरती खर्च येतोय. जवळ दातावर मारायला पैसे नाहीत. पोटापाण्याचं कसबस चाललय. मग एकदम दोन एकराची लावण करायला पैसे कुठून आणणार. या विचाराने तो गलबलून जायचा. या संदर्भात मोहन पाटील म्हणतात, ''त्या विचारानं तो दाट फडात आत आत शिरल्यागत घोटाळू लागला. त्याच्या अंगाला ऊसाची धारदार पान कापू लागली. त्याचे ओरखडे मनावर उठू लागले. पण ऊसाच्या विचारानं एरगाटलेल्या किशाला कशाचीच शुद्ध उरली नाही.''[५] काहीही करून लागण करायची असे त्याचे स्वप्न होते. कारण ऊसाशिवाय दुसऱ्या पिकात एवढे पैसे मिळत नाहीत. प्रत्येकाची इच्छा असते आपणही इतरांच्यापेक्षा चांगले दिसावे श्रीमंत व्हावे, गाडी घ्यावी, बंगला बांधावा हेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी किशाला ऊस लावायचा होता. एकदा ऊसाने किशाला फसवले

होते. रसातळाला बसवले होते. तरीही ऊस लावण्याची जिद्द काही किशाची कमी झाली नव्हती. ऊस पीक म्हणजे त्याचे स्वप्न पूर्ण करणारा परमेश्वर होता. या संदर्भात क्षितीज पाटुकले म्हणतात, ''जगावर सतत टिका करायची. नशिबाला दोष द्यायचा. सगळ्यांचे दुर्गुण उकरत स्वतःचेच आयुष्य कुरतडीत बसायचे. आपल्यापेक्षा वरचढ असतील त्यांना वशिल्याचे तट्टू, नशीब, हुजरेगिरी, लाळघोटेपणा इ. दुषणे देत रहायचे. आणि स्वतःचे आयुष्य आणि क्षमता कुजवत बरबाद करीत रहायचे. अनेकदा मरत नाहीत म्हणून जगणार माणसेच आपल्या अवतीभोवती असतात.''[६] म्हणून शेतकऱ्यांनी जिद्दीने स्वाभिमानाने जगायला हवे. आजूबाजूला असणाऱ्या मेंगळट माणसांच्या नादी न लागता. धैर्याने कोणत्याही कामाला सामोरे गेले पाहिजे. मला हे जमणार नाही असे न म्हणता मी हे करून दाखवीन या धाडसाने कार्यरत राहिले पाहिजे.

किशा पंचायत समितीच्या कट्ट्यावर बिढी ओढत बसलेला, एवढ्यात तुका मेंबर तिथे आले. किशाचे व तुका मेंबरचे बोलणे चाललेले, किशा आपल्या समस्या मेंबरना सांगत होता. तर मेंबर त्यावर त्याला उपाय सांगत होते. तेव्हा किशा मेंबरना म्हणाला, ''जीवाला मस्त वाटतयं, मेंबर! मातीत आतडी तोडून राबावं काळ्या मातीत ऊस पेरावा. त्यातनं पाढरं सोनं काढावं, पडक्या घरावर सोन्याची कौलं घालावी, चुलीतनं सोन्याचा धुर काढावा. एवढंच नव्हं, तर चांदीची चिलीम करून त्यात सोन्याची तंबाखू भरावी. तोंडातनंबी सोन्याचा धूर सोडावा पर ते जमणार कसं? रान मायंदाळ पिकवायचं तर आधी गाडीभर पैसा लागतोय त्यो आणायचा कुठनं.''[७] सृष्टीच्या नियमानुसार प्रत्येकाला स्वप्न पहाण्याचा अधिकार असतो. स्वप्नांच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या कल्पना रंगवत असते. ती पूर्ण झाल्याची स्वप्ने पहात असतो. परंतु अशा कल्पना प्रत्यक्षात रंगविण्यासाठी पैशाशिवाय पर्याय नसतो. पैसा असेल तर माणसांची स्वप्ने प्रत्यक्षात साकार होत असतात. नाहीतरी कल्पनेतच राहून जातात. तशीच अवस्था किशाची आहे. पाण्याअभावी पिक जसे करपून जाते तसेच पैशाअभावी इच्छा कल्पनेतच करपूर गेल्यात.

सगळ्याच शेतकऱ्यांना ऊस लावण करायची खूप इच्छा असते. परंतु पाण्याअभावी जास्तीत जास्त भांडवलाअभावी ते लावण करू शकत नाहीत. लागवड, मशागत, पाणीपट्टी, बियाणे या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी त्याच्याकडे भांडवल नाही. पैशाशिवाय तर कोणतीच शेतीची कामे होऊ शकत

नाहीत. उधारीत रोजगारी भांगलायला येत नाहीत बाकीच्यांचा विचारच करायला नको. आर्थिक वावटळीत अडकलेल्या या शेतकऱ्यांना आशेची नवीन वाट दाखविण्यासाठी कारखान्याने ऊस विकास योजना हाती घेतली आहे. त्यापाठीमागचे उद्दिष्ट म्हणजे ऊस क्षेत्र वाढवावे आणि गरीब अल्पभूधारक शेतकरीही त्या निमित्ताने कारखान्याचे सभासद व्हावेत. त्यातून त्यांचा विकास व्हावा. या हेतूने ही योजना राबविण्यात आली होती. शेतकऱ्यांची कितीही कष्ट करण्याची तयारी असते. परंतु भांडवलाअभावी जिथे–तिथे त्याला माघार घ्यावी लागते. आमचा बळीराजा कष्टाला कधीही मागे पडला नाही. त्याला संकटात आणले, इतर समाजघटकांपेक्षा पाठीमागे, दारिद्र्यात ठेवले ते या पैशानेच.

किशाचा मित्र बाळा हाही आर्थिक संकटांनी बेजार झाला होता. त्यामुळे त्याला कोणत्याच गोष्टीत रस नव्हता. त्याच्या डोक्यात ऊस योजनेचे कर्ज काढल्यानंतर मिळणाऱ्या पैशाची वाटणी सुरू होती. त्याने जुने घर उतरून डागडूजी सुरू केली होती. थोडेफार साहित्य घरचे होते. राहिलेले विकत घेतले होते. तसेच त्याच्या घरात खाणारी तोंड रावणापेक्षा दोन जास्तच होती. घरातील शेतीत राबणारी पगारदार कोणीच नव्हते. पैसा म्हटलं की बाळाचं तोंड सदानकदा वाकडंच होते. त्यातही कर्ज म्हटल्यावर त्याच्या तोंडची रयाच जाती.

शामा ही परिस्थितीने गांजलेला होता. कशाचा पायपोस कशाला लागत नव्हता. त्यामुळे जीवनातील दुःखानी, समस्यांनी अवजड झालेल्या डोक्याला शांत करण्यासाठी दुःख विसरण्यासाठी तो दारूचा आधार घेत होता. तेवढ्यापुरते का होईना त्याचे डोके शांत होत होते. त्याची मुलगी डिलेवारीला आली आहे. दिवस भरलेत डॉक्टरांनी ऑपरेशन करायला सांगितले आहे. त्याला सहा हजार रूपये खर्च होता. उरले चार हजार त्यात लावण कशी करायची. या प्रश्नाने तो चिंतित झाला होता. या सर्वाचा मेळ कसा बसवायचा हे त्याला समजत नव्हते. कारण दोन्ही गोष्टी तितक्याच महत्वाच्या होत्या. कोणतीच अडवून चालणार नव्हती. आर्थिक समस्येमुळे शेतकरी अडचणीत आला होता. भांडवला अभावी तो काहीही करू शकत नव्हता. त्याच्या कष्टाला पैशाची साथ मिळाली तर तो शेतीत सोने पिकवेल. त्याचा कोणीही हाथ धरू शकणार नाही. सबल घटकात तो सन्मानाने वावरू शकेल. कोणाच्याही मदतीची गरज त्याला भासणार नाही.

शेतकरी आर्थिक संकटात आजच अडकला आहे असे नाही तर तो पूर्वीपासून याच परिस्थितीत जगत आहे. जे वाट्याला येईल ते सोसत होता. त्याची सुखी जीवन जगण्याची सुत्रे मोजकीच होती. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, ''आयुष्यात क्षण नि क्षण तो कष्टत होता. पण घड्याळाच्या काट्यांवर त्याला कळसुत्री बाहुली होऊन नाचावं लागत नव्हतं. आपल्या नशिबी फार मोठं दारिद्रय आणि कष्ट आले आहेत. म्हणून तो दुःखी नव्हता. पाल्याच्या झोपडीतही सुखी होता. कारण पोटभर खायला, अंगभर ल्यायला नि रातभर पडायला आडोसा मिळाला की त्याला सुख वाटे. तेवढं त्याच्या कष्टातून उभं राही.''[८] आता अशी परिस्थिती राहिली नाही. शेतकऱ्यांची जगण्याची पद्धत बदलली आहे. इतरांप्रमाणे त्याच्याही इच्छा वाढल्या आहेत. बंगला, गाडी, इत्यादी गोष्टीचा त्यालाही हव्यास निर्माण झाला आहे. त्यामुळे आपणही पैसे कमवून अशा गोष्टी घ्याव्यात अशी त्याची इच्छा आहे. सर्व सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग मात्र आणता येत नाही. त्याचप्रमाणे आर्थिक संपन्नतेअभावी तो काहीही करू शकत नाही. त्यांच्या स्वप्नांच्या कळ्या कधीच फुलत नाहीत. त्या मनातच कोमेजून जातात.

## २) सहकार :-

सहकाराचा अर्थ co-operation हा इंग्रजी शद्ब लॅटिन भाषेतील co म्हणजे सह आणि operari म्हणजे काम करणे. या दोन शद्बापासून सहकार शद्ब बनलेला आहे. सहकार एकमेकांच्या सहकार्याने, मदतीने काम करणे होय. तर सहकारी संस्था म्हणजे अनेक लोकांनी स्वतःच्या इच्छेने संघटित होऊन आर्थिक प्रगती करण्यासाठी समानतेच्या तत्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय. सहकार म्हणजे सोन्याचे अंडे देणारी कोंबडी आहे. तिचे व्यवस्थित पालन केले तर रोज एक अंडे मिळेल पण तोच जर मुळापासून उखडून काढायचा म्हटले तर काहीच मिळणार नाही. समाजातील सर्वच सहकारी संस्थांमध्ये भ्रष्टाचाराची मुळे खोलवर रूजली आहेत. तो सहकार न राहता स्वाहाकार झाला आहे. त्यामुळे आपला कारखाना म्हणणारा शेतकरी तुमचा कारखाना म्हणू लागला. याच कारखान्याने शेतकऱ्यांना गुऱ्हाळा पासून परावृत्त करून पांढऱ्या साखरेत अडकवले.

ऊसापासून काकवी, दारू, ॲसिड, इंधन, अल्कोहोल इत्यादी अनेक घटक तयार करता येतात. त्यामुळे पैसाही खूप मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी गुऱ्हाळे बंद करून आयता ऊस कारखान्याला पाठवू लागले. त्यामुळे इतरही पीके घेणे त्याने बंद केले या राजकारणी मंडळींच्या नादी लागून चार पैशाच्या मागे धावता धावता अन्नाला मुकला.

खरे तर सहकारी कारखाने शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रगतीसाठी उभे करण्यात आले होते. शेतकऱ्यांचेच शेअर्स एकत्र करून या संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यामुळे शेतकरी हेच कारखान्याचे मालक होते. परंतु झाले मात्र उलटेच शेतकरी कारखान्याचे शोषिक होऊन कर्जबाजारी व दुःखी झाले. कारखाना व्यवस्थापनाला या सर्व गोष्टींचा विसर पडला आहे. यापाठीमागचे कारण म्हणजे सहकारी नेतृत्वाचा कमीपणा व भ्रष्टाचार आहे. ज्या ऊसाने देशाच्या अर्थव्यवस्थेत लाखो रूपयाची भर घातली. त्याच ऊसाला आता वाईट दिवस आलेत. सहकारातील भ्रष्टाचारामुळे सर्वत्र अविश्वास रूजला आहे. कोणालाच कारखान्याविषयी प्रेम राहिले नाही.

बोरीगाव सहकारी पाणी सोसायटीत खत, रॉकेल, धान्य दुकान होते. परंतु भ्रष्टाचारामुळे ते बंद पडले होते. खत डेपो, तेवढा उघडा होता. खत डेपो आन्नीशा बघत होता. आन्नीशा सोसायटीत दिवसभर बसून काम पहात असे. त्याबरोबर भरमू शिपाई ही सकाळ पासून संध्याकाळपर्यंत सोसायटीतच असे. जयसिंग अण्णांची साडे अकरा बाराच्या सुमारास सोसायटीत हमखास फेरी असे. तास-दोन-तास ते सोसायटीत बसायचे ते पुन्हा दुसऱ्या दिवशीच सोसायटीत येत असत. कारण त्यांना विचारणारे कोणीच नव्हते. त्यांच्या मनाचाच सर्व कारभार चाले. बाळीशा मगदूम सोसायटीत खताचे पोते न्यायला आला तेव्हा आन्नीशा त्यांना म्हणाला सिद्या मातीला गेलाय दुपारी दोनच्या पुढे ये यावर बाळीशा म्हणाला कधीही या खताचे दुकान बंद असते. सिद्याचा पाहुणा वारला तिकडे तो तिसऱ्याला गेला होता. यायला त्याला वेळ होणार होता. त्यामुळे बाळाला खत मिळणार नव्हते बाळीशाचा नाईलाज झाला. पवाराच्या विहिरीच पाणी त्याने गव्हाला विकत घेतले होते. पाण्याबरोबर खत टाकावे म्हणून तो खत आणण्यासाठी गेला होता. तर ही अवस्था गावात सोसायटीचे दुकान असूनही काही फायदा नव्हता फक्त नावापुरते दहा-पंधरा मिनिटात शामा सोसायटीत आला

आणि त्याने आन्नीशाला सांगितले. तुझ आवर आता आणि घरीजा पोटापाण्याच बघा. मी अण्णांना बघतो. यावर आन्नीशा शामाला म्हणे. मी नऊ वाजता येतो. एवढ्या लवकर काही जेवण जात नाही. बाराला भूक लागते. पोटात कावळे ओरडतात. साहेब नाष्टापाणी करून बारा वाजता येतात. अगदी जेवण वेळ गाठून. त्यामुळे काहीही करून इथेच बसावे लागते. ते गेल्यावर मग जेवण, पुन्हा सोसायटीत येऊन सहा वाजेपर्यंत बसायचे. आन्नीशाकडं साफ दुर्लक्ष करीत शामा डोळे रोखून म्हणाला, "हेलाच सहकार म्हंत्यात. सहकारात कामाची पद्धत घड्याळ ठरवत न्हायी. तुला कुडबुडं वाजवाय जमतंय? कामात अडकावून हॉटेलात आडवं कराय जमतंय? न्हाई नव्हं? तर मग गप्प बस. आपून आज्ञा ऐकायची. बोलायचं नाही. ऐकण्यासाठी जन्म आपुला![९] सत्तेपुढे आपले काहीच चालत नाही. जरी नियमात बसत नसले तरी सत्ताधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून त्याचे पालन करावे लागते. कारण आपल्याला गरज असते. त्यातल्या त्यात सहकार क्षेत्र म्हणजे सत्तेचा आगरच. नाव फक्त सहकार कारभार मात्र खाजगीच सहकार सहकार नक्की कसा आहे. या संदर्भात नितीन गजाननराव देशपांडे म्हणतात." सहकार नुसता नावातच आहे. एरवी घराणेशाहीच्या जाळ्यात असलेल्या या प्रायव्हेट लि. कंपन्याच झालेल्या आहेत. याचे भान जेव्हा शेतकऱ्यांना आले तेव्हाच ते नावापुरत्या असलेल्या आपल्या कारखान्याविरूद्ध उभा राहिला. कुणाचं काहीतरी नक्कीचं चुकत आलं आहे. चुका सुधारण्याच्या पलीकडे गेल्यामुळेच चुकांची दुरूस्ती होईल या भाबड्या आशेवर तो इतकी वर्ष रेटत आलाय."[१०] आज ना उद्या सहकाराची स्थिती सुधारून पुन्हा पूर्ववत होईल या आशेवर शेतकरी होते परंतु सहकार सुधारण्याचे काही दिसत नव्हते उलट दिवसें दिवस त्यातील खाजगी कारभारामुळे कारखाना कर्जबाजारी झाला होता. काही कारखाने तर बंदच पडू लागलेत.

शामा व जयसिंग अण्णा दोघे सोसायटीत गप्पा मारत बसलेले होते. जयसिंगअण्णा शामाला कारखान्यात संचालक होण्यासाठी फिल्डिंग लावायला सांगत होते. तेव्हा शामा म्हणाला. भरमू शिपाई तुमच्या ऊसाला पाणी पाजतोय त्याची बायको सुंदरा तुमच्या सेवेला बँकेतल्या कर्जप्रकरणाचे हजार पाचशे मिळत्यात. शेजारच्या चार गावांवर तुमचे प्रभुत्व आहे. मग तुम्हाला कशाला कारखान्यात जायचं आहे. तेव्हा अण्णा म्हणतात, "शामराव तुमच्यासारख्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

माणसाचं हा आशीर्वाद हाईत, म्हणून ह्या अण्णाचा गाडा चाललाय. उद्या तुज्या सारख्यानं खिळ घालायचीच ठरवली. तर ह्या अण्णाचा गाडा जिथल्या तिथं आडकलाच म्हणून समज.''[११] अण्णानं सारख्या नेत्यानाही माहित होते. चार कार्यकर्ते सांभाळल्याशिवाय आपली खुर्ची टिकून राहणार नाही. त्यामुळे त्याना खूष करण्यासाठी हे नेते स्वतःच्या खिशातील पैशाचा वापर न करता संस्थेतील पैसे वापरतात शिवाय आपलेही खिसे भरतात. मग संस्था तोट्यात येवो अथवा न चालो त्यांचे काय जाते. समजा मोडकळीस आली तर लगेच एखाद्या बँकेचे भरमसाठ कर्ज घ्यायचे ते थोडीच त्यांना फेडावे लागणार असते. ते संस्थेच्या नावे असते त्यामुळे हे नेते लोक कोणत्याही गोष्टीचा विचार न करता मनमानी कारभार करतात. तसेच संस्थेतल्या शिपायाना आपली खाजगी कामे करायला लावता जणू काही हे शिपाई त्यांच्या स्वतःच्या मालकीचे असल्यासारखे त्यांच्याशी वागतात. अण्णाच्या बोलण्याला उत्तर देण्यासाठी शामा म्हणाला, 'असंच हाय हे अण्णा. तुमचा गाडा आमी वडायचा आमचा खटारा तुमी ढकलायचा असं दोघांच्या सलामतीनं चालवायचं असतंय हेलाच सहकार म्हंत्यात. एकमेकाला सहकार्य केल्याशिवाय विकास तरी कसा हुणार?'[१२] एकमेकांच्या सहकार्यातून विकास या फक्त नावापुरत्या गप्पा आहेत. प्रत्यक्ष स्थिती मात्र वेगळीच आहे.

जेव्हा सहकारी संस्था स्थापन केल्या तेव्हा एकमेकांच्या सहकार्यातून केल्या होत्या. एकमेकांचे सहकार्य हिच भावना होती. परंतु कालांतराने परिस्थिती बदलली. सहकारी संस्था नावापुरत्याच राहिल्या. आता त्या खाजगी लोकांच्या सत्तेमुळे मोडकळीस येऊ लागल्यात. सर्वत्र अंधाधुंदीचा कारभार वाढला आहे. हम करे सो कायदा कोण विचारणार काय करताय म्हणून. विचारणार कोण तर शेतकरी सभासद. त्यांना कोण दाद देणार. एखाद्याने धाडसाने विचारपुस केली तर नंतर त्याला एकटा गाठून धमकी देतात. त्याची कामे अडवितात त्याला चारी बाजुंनी पेचात अडकवतात जेणेकरून तो पुन्हा असे काही करणार नाही. त्यामुळे शेतकरी म्हणतात असल्या कटकटींना सामोरे जाण्यापेक्षा सर्वांचे जे होईल ते आपले होईल. थोडा आपल्या एकट्याचा तोटा होतोय. अशी भावना लोकांच्यात निर्माण झाली आहे.

कारखान्याच्या जनरल सभेदिवशी सर्वत्र कडक बंदोबस्त होता. शेतकरी प्रचंड संख्येने

सभेला हजर होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे झोंबडे-पाटील सभा मंडपात हजर राहताच त्यांच्या नावाचा जयजयकार करण्यात आला. पाटलांनी सर्वांना सभामंडपात येण्यास सांगितले जे प्रश्न सोडवायचे आहेत ते सभेत मांडा रस्त्यावर नको. सर्वांनी मिळून लोकशाही मार्गाने प्रश्न सोडवूया. त्यामुळे सभा मंडप लोकांनी गच्च भरला. पाटलांनी प्रथम स्वर्गीय व्यक्तिंना श्रद्धांजली वाहिली व नंतर भाषण चालू केले. ''शेतकऱ्यांच्या ऊसाला योग्य दर मिळाला पाहिजे. यासाठी कारखाना प्रशासन प्रयत्न करत आहे. या गोष्टी जलदगतीने होत नसतात. तर लोकशाही मार्गाने त्या सोडवू या. आंदोलन करून ऊसाचा प्रश्न सुटणार नाही. आपला देश सर्व जगात शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. हा शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांचा देश आहे. एवढ्या मोठ्या देशात लोकशाही नांदते आपल्या देशात सहकारी तत्त्वावर जी कारखानदारी उभी आहे त्याचे महत्वाचे कारण म्हणजे आपले राज्य संपूर्ण देशात विकासकार्यात आघाडीवर आहे. ही कारखानदारी जर मोडीत निघाली तर राज्याचे आणि देशाचे भयंकर नुकसान होईल. सहकाराला वाईट मार्गाने नेणाऱ्या लोकांना ठणकावून सांगितले पाहिजे. महात्मा सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा आहे. या वैराण माळावर पूर्वी काय होत. गावातील वृद्ध मंडळी सांगतील या माळावरती तीस-पस्तीस वर्षापूर्वी दिवसाढवळ्या माणूस फिरकत नव्हता. लोक घाबरायचे आता हे सर्व बदलले आहे. सहकारामुळे शेतकऱ्यांच्या प्रयत्नामुळे उजाड माळावर नंदनवन उभे राहिले माळावर साखरेचे पेव फुटले. ऊसामुळे साखरेचे सोने झाले.''

पाटलांना सहकाराचे महत्व पटले होते. उजाड माळाचे नंदनवन करण्याची ताकद सहकारात आहे हे ते लोकांना पटवून देत होते. परंतु त्यांचे खायचे दात वेगळे व दाखवायचे दात वेगळे असतात. वरच्या मनाने जरी ते सहकाराचे महत्व सांगत असले तरी आतल्या मनाने त्यांनी सहकाराची मुळे खोडून काढून त्याला भुसभुशीत करून टाकले आहे. लोकांना भुलविण्यासाठीच्या या गोड-गोड गप्पा आहेत. सहकाराला पायधुळीला मिळविण्याचे काम या भ्रष्ट नेत्याचेच आहे. मालकी हक्क शेतकऱ्याचा पण सत्ता मात्र या भ्रष्ट नेत्याची. पाटलांच्या या गोड भाषणांमध्ये सर्वजण मशगूल झाले होते. संघटनेचा नेता मात्र पाटलांच्या या भुलथापांना न भाळता मध्येच उठला व म्हणाला, ''गुळमाट भाषणबाजी बंद करा प्रथम साखरेचा दर ठरवा

आणि मग बोला.'' असे म्हटल्यामुळे सर्व लोक भानावरती आलेत. आपण आपला मुख्य प्रश्न विसरून दुसरीकडेच भरकटत चाललो आहोत याचे भान त्यांना आले. घोषणा प्रतिघोषणांनी सभामंडप हादरला. सभेत गोंधळ सुरू झाला. कारण पाटलांच्या सांत्वनाचे चार शद्ब कोणालाच नको होते. प्रत्येकाला फक्त ऊसाला दर हवा होता. सहकारामुळे किती प्रगती होते हे आपल्या सर्वांना माहित आहे. सहकार बंद पडल्यावरती त्या कारखान्याचेच नाही तर देशाचे, राज्याचे नुकसान होणार आहे. सहकारामुळे कितीतरी लोकांना जगण्याचा मार्ग सापडला. त्यांचे जीवनमान सुधारले. उजाड माळाचे नंदनवन झाले. जी माळ नापीक होती तिथ सोन्याचा धुर निघू लागला. हे सहकारामुळेच शक्य झाले. सहकार जर मोडीत निघाला तर पुन्हा कितीतरी घरे उपाशी मरतील. राज्याचे आर्थिक नुकसान होईल. या संदर्भात तानाजी राऊ पाटील म्हणतात, ''वर्तमान स्थितीमध्ये सहकारी साखर कारखान्यांच्यामध्ये भ्रष्टाचार वाढला आहे. सहकार म्हणजे स्वाहाकार झाला आहे. साखरसम्राट स्वतःला कोणी तरी वेगळे समजतात. त्यांच्या अंगात सत्तेची धुंदी आहे. सत्तेच्या राजकारणासाठी सहकारी साखर कारखान्यांना वेठीला धरतात. त्या त्या परिसरातील माणसांच्यावर दबावतंत्राचा वापर करतात. राजकारणही त्यांच्याच ताब्यात असते. त्याचबरोबर सहकारी साखर कारखान्यांची सूत्रेही यांच्याच हातात असतात. कुणाला नोकरी द्यायची, कुणाला पुढारी बनवायचे, त्याला कुठं पर्यंत साथ द्यायची आणि नेमके कुठे एकटे पाडायचे, ही सगळी षडयंत्रे ही मंडळी कारखान्याच्या सारीपाटावर बसून करतात. सहकारी कारखान्यातील पैशाचा गैरव्यवहार करून त्यातून लाखो रूपयांचा भ्रष्टाचार करतात. सहकाराचे सर्व क्षेत्र आज भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे.''[१३] सध्याच्या काळात सहकाराची स्थिती अतिशय बिकट झाली आहे. जो-तो आपल्या स्वार्थापुरता विचार करू लागला आहे.

तुका मेंबर हे आंदोलनाच्यावेळी कारखान्याच्या बाजुने तर शामा शेतकरी संघटनेच्या बाजुने होते. शामावरती संघटनेचा विश्वास होता. संघटनेतील महत्वाचा कार्यकर्ता म्हणून त्याला ओळखले जात होते. या गडबडीतच तुका मेंबरनी शामाला भेटायला बोलवले. तेव्हा शामाला काळजी वाटू लागली. जावे की जावू नये. कारण गेलो नाही तर मेंबर चिडणार,

जावे तर लोकांचा अविश्वास ओढवणार. तरीही विचार करून शामा मेंबरना भेटायला गेलाच. मेंबर व शामा दोघेही आंदोलनाविषयी गप्पा मारू लागले तेव्हा मेंबरनी शामाला सहकाराचे महत्त्व पटवून दिले. मेंबर म्हणाले, ''म. गांधींनी या देशालाच नव्हे, तर संपूर्ण जगालाच सहकार या शद्बाची ओळख करून दिली. त्याचे महत्व पटवून दिले.''[१४] त्यामुळे आज आपल्या देशात दोनशेच्या वरती साखर कारखाने आहेत. ते शेतकऱ्यांच्याच मालकीचे आहेत. कारण ते त्यांच्या भागभांडवलावर उभे आहेत. साखर उद्योग, दूध प्रकल्प, सहकारी सोसायट्या, पतसंस्था, बँका यांचा मुळ उद्देश काय तर चार लोकांनी एकत्र यावे एकमेकांच्या सहकार्याने एकमेकांचा समान विकास करावा हे मुख्य तत्व होते. हे तत्व किती पाळले गेले. ज्यांच्यासाठी पाळायचे होते ते बाजुलाच राहिले. उलट बड्या-बड्या मंडळींनीच सहकारातून सर्वांचा विकास करण्याऐवजी स्वतःचाच विकास केला. बाकीचे सर्व तसेच राहिले. या विषयी चंद्रकांत खंडागळे म्हणतात, ''शेतीची सुधारणा झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही सुधारली आहे. तथापि हा बदल बड्या व श्रीमंत शेतकऱ्यांपुरताच मर्यादित आहे. लहान व गरीब शेतकरी आजही परंपरागत पद्धतीने शेती करत आहे. त्यांचे दारिद्रय हटलेले नाही. शासकीय योजनांचे सर्व फायदे बडे शेतकरीच लाटताना दिसतात. अल्पभुधारक गरीब शेतकरी मात्र या फायद्यांपासून वंचित राहिलेला दिसतो.''[१५] मुळ हेतू बाजुला जाऊन सहकारी संस्था राजकारणाचे अड्डे बनल्या. या अड्ड्यांना सांभाळणारे नेतृत्व ही उदयाला आले. त्यांनी अड्डे सांभाळले आणि अड्ड्यांवरच्या चार लोकांनी आपली पोटं भरली. सगळ धुळीला मिळाले. ज्यांच्या नावाने, ज्यांच्या एकजुटीने सहकारी संस्था उदयाला आल्या ते फक्त नावापुरतेच कागदोपत्रीच राहिले. राजकारण सांभाळण्यासाठी आपल्या खुर्चीची सत्ता टिकविण्यासाठी पुढाऱ्यांनी चुकीचे निर्णय घेतले. माणसे सांभाळायची म्हणजे मते सांभाळायची. याची त्यांनी पर्वा केली. मते सांभाळली की खुर्ची टिकते या पलिकडे त्यांनी कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही. या विषयी चंद्रकांत खंडागळे म्हणतात, ''अनेक साखर कारखाने हे गलिच्छ राजकारणाचे अड्डे बनले असून साखर सम्राटांचा एक दबावगट राज्याच्या राजकारणात उदयास आला आहे. या गटाने ग्रामीण भागातील सत्तेवर कब्जा मिळवला आहे. अनेक कारखाने हे विशिष्ट कुटुंबाची खाजगी मालमत्ता बनले आहेत. त्यातूनच सहकारी क्षेत्रातही

घराणेशाही निर्माण झाली आहे. कारखान्याचे संचालक हे विशिष्ट कुटुंबातीलच असतात. ते दहशत, गुंडगिरी, पैसा यांचा वापर करून सामान्य सभासदांवर वर्चस्व गाजवितात. कारखान्याची मालमत्ता स्वहितासाठी वापरतात. सभासदांच्या हिताकडे दुर्लक्ष करून कारखान्याचा उपयोग आपले राजकीय हितसंबंध साधण्यासाठी करतात. कारखान्याच्या निवडणूका व सर्वसाधारण सभा म्हणजे हाणामारी, गुंडगिरी, दहशत असे समीकरण झाले आहे.''[१६] आपल्या मुळे दुसऱ्यांचा तोटा होतो याचा कोणी विचार करायला तयार नाही. तेही देशाचे नागरीक आहेत त्यांचाही संस्थेवर विश्वास आहे. या सर्वांचा विचार करून एक व्यापक राष्ट्रीय सामाजिक समान संधी देणारे विकासाचं सुत्र डोळ्यापुढे ठेवले होते. 'ग्रामराज्य' गांधीजींच्या स्वप्नातले 'ग्रामराज्य' कुठ गेले ते गांधीजीच्या बरोबरच गेले.

स्वातंत्र्यानंतर देश सुखी होईल. सर्वत्र सुख समाधान लाभेल. असे सर्वांना वाटत होते. झाले मात्र उलटेच सर्वत्र अंदाधुंदी माजली जो तो स्वतःच्या स्वार्थाचा विचार करू लागला. जो जोर करतो, संघटित होता, ताकतीने उभारतो, त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या जातात. बाकीच्यांना मात्र तसेच ठेवले जाते. तात्पुरते प्रश्न मिटवायचे असे करण्यापेक्षा कायमस्वरूपी त्या प्रश्नावर तोडगा काढला असता तर ही वेळ आली नसती. सर्वांचेच भले झाले असते. या विषयी कादंबरीमध्ये सहकाराची स्थिती कशी आहे याचे उदाहरण दिले आहे. ते अतिशय योग्य व समर्पक आहे.

नरसोबाच्या वाडीला दत्ताचे प्रसिद्ध देवस्थान आहे. तिथे दरवर्षी दत्त जयंतीला तुका मेंबर लहानपणी जात होते. परंपरेने चालत आलेले व वडील थकल्यामुळे सुठवडा वाटायचे काम तुकाकडे आले होते. सुठवडा वाटताना एक गंमत व्हायची खरे तर तशी ती साधीच गोष्ट होती. परंतु विचार केला तर त्यातून खूप काही घेण्यासारखे होते. तसेच ती सहकाराशी खूप मिळती जुळती होती. सुंठवडा वाटायला मेंबर उंच पारावरती उभे रहात. सुंठवडा घ्यायला अनेक भाविक जमत. सर्वजण एकदम गोंधळ करीत. सुंठवडा घेण्यासाठी सर्वांची गडबड चाले. सर्वजण हात वरती करून मला, मला करत. तुकाही त्यांच्या हातावरती सुंठवडा ठेवत असे. तेव्हा मेंबरांच्या लक्षात आले ज्यांचे ज्यांचे हात डब्यापर्यंत पोहचत त्यानाच प्रथम सुंठवडा मिळे. खाली

हात असणाऱ्याना तसेच रहावे लागे. म्हणून तुका थोडा खाली वाकून सुंठवडा घ्यायचा प्रयत्न करे. तेवढ्यात गर्दी वाढायची ढकला-ढकली व्हायची. उंच हात पुन्हा वरती व्हायचे. त्यामुळे नाईलाजाने उंच हातावरतीच सुंठवडा पडत असे. वाटता वाटता सुंठवडा संपत असे आणि शेवट पर्यंत लहान लहान हात डब्यापर्यंत पोहचत नसत. बिना सुंठवड्याचे निराश होऊन बिचारे माघारी जात. अशीच अवस्था आपल्या देशातील सहकाराची झाली आहे. स्वातंत्र्य मिळाले पण स्वातंत्र्याची फळे कुणाला मिळाली? सुंठवड्या प्रमाणे ज्यांचे हात वरपर्यंत पोहचत होते. मुळातच जे बलिष्ट आहेत. त्यांनाच मिळालीत बाकी लहान सहान लोक ज्यांचे काहीच चालत नाहीत ती तशीच रिकामी हात हलवत राहिलीत. प्रत्येक वेळी त्यांच्या आशेची निराशा झाली. वरपर्यंत ओळखी नसल्यामुळे, कोणतीही सत्ता हातात नसल्यामुळे, तसेच काही कार्यवाही करायची तर ते एकट्याने करणे शक्य नाही. त्यामुळे ते नेहमीच प्रत्येक योजनान पासून दूर राहिले. यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघटना निर्माण केली पाहिजे. शामाच्या मते गांधीजींच्या अहिंसा व स्वदेशी या तत्त्वानुसार ऊसाचे पीक हे स्वदेशी आहे. गांधीजींच्या तत्त्वाला अनुसरून आहे. परंतु सुरूवातीला ऊसाच्या पिकाचे काहीच वाटत नव्हते. ऊस कारखान्याला गेला नाही तर तो गाळून त्याचा गूळ तयार करून विकला जायचा. परंतु आजकाल लोकांना कष्ट नको विना कष्टाचे आयते पैसे पाहिजेत. त्यामुळे जास्तीत जास्त लोक ऊस कारखान्याला घालवायचा प्रयत्न करतात. त्यामुळे एवढे ऊस गाळप कारखान्याला संपत नाही. नग शेवटी ऊस तोडीवाल्याना जास्त पैसे देऊन, जाळून असे काहीतरी करून तो कारखान्याला घालवावा लागतो. या संदर्भात मोहन पाटील म्हणतात, ''गेल्या दहा वर्षात ऊसाचा प्रश्न इतका किचकट झालाय की, खुद्द महात्माजी जरी स्वर्गातून खाली आले तरी हा प्रश्न सोडवतो म्हणाले तरी सुटायचा नाही. एवढी गुंतागुंत या प्रश्नात आहे. सगळी घाण झाली. फार विचारपूर्वक निर्धारानं हा प्रश्न सोडवावा लागणार''[१७] कारण सहकार उदयाला आला तेव्हा त्यातील कारभार पाण्याप्रमाणे निर्मळ होता. कालांतराने नदीच्या पाण्याची जी अवस्था झाली तिच सहकाराचीही झाली. कोणतेच पावित्र्य त्यात राहिले नाही. सहकार फक्त नावापुरता शिल्लक राहिला. त्यावरती खाजगी मालकांनी आपला हक्क प्रस्थापित केला. गरीब बिचाऱ्या सभासदांना याचा अंदाच लागला नाही ते बिचारे त्यांच्या होला

हो करत राहिले. आणि आपल्याच पायावरती दगड मारून घेतला. या संदर्भात तुका मेंबर म्हणतात, ''सहकारात एका बाजूला चांगली माणसं होती. ती गेली त्या जागी वाईट प्रवृत्ती शिरल्या. ज्यांना सहकार म्हणजे काय तो कशाशी खातात ते माहीत नाही, असे केवळ पुस्तकी लोक सहकारात आले. ते शिकलेले त्यांच्या बापांनी संस्था काढली म्हणून हक्कानं ते शिरले. त्यांनी सहकाराचे दुकान मांडले. एक व्यापारी मेल्यावर जसं त्या गादीवर त्याच्या पोरानं बसावं तसं झालं हे. तुला मला काय बोलता आलं नाही. का तर संस्था त्याच्या बापाची म्हणून त्या साऱ्यांवर त्याचा हक्क. सातबारा त्यांच्या नावानं. दुसऱ्या बाजूला सहकारी क्षेत्रातील दुष्ट प्रवृत्तींना बाजूला काढून ही चळवळ स्वच्छ करावी तर मुळं इतकी खोल रूजलीत राजकारणाची की त्यांना धक्का लावला की जीवावर बेततं अशी स्थिती झाली.''[१८] या सर्वातून बाहेर पडण्यासाठी सर्वांनी एकत्र संघटित व्हायला हवे. फक्त गरिबांच्या नावाने मोकळी छाती पिटून सुंठवडा वाटून समाजाचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी सर्वांनी संघटित होऊन लढा दिला पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून असत्य विरूद्ध असत्य असा लढा दिला जात आहे. दोन्ही पक्ष आप–आपल्या खुर्च्या वाचविण्यासाठी वाट्टेल ते प्रयत्न करत असतात. त्यामुळे दोन्हीतल्या एकाचा का होईना पक्ष धरावाच लागतो. त्यातही दगडापेक्षा वीट मऊ म्हणून कोणाला तरी निवडून आणायचे आणि देशाची इमारत उभी करण्यासाठी सत्याची वीट रचण्याचा प्रयत्न करायचा. जेणे करून हा पक्ष तरी बऱ्यापैकी काम करेल. कारण जय हा दोन्हीतल्या एका असत्याचा असतो. या घाणेरड्या राजकारणाला कंटाळून अनेक चांगले लोक बाजूला सरकलेत. त्याना संधी साधून पुन्हा राजकारणात ओढण्याचा प्रयत्न करायचा असे वेळोवेळी करत राहिले तर सर्वत्र चांगल्या राजकारणी लोकांची संख्या वाढेल. उदा. एखाद्या घाण पाण्याच्या डबक्यात दुसरं स्वच्छ पाणी सतत भरत राहिले. चिकाटीने भरत राहिले तर एक दिवस स्वच्छ नितळ पाण्याचे डबके तयार होईल. तसेच दुसऱ्याचे हित जाणणारा, चांगला प्रामाणिक माणूस जर राजकारणात आला तर पुन्हा पूर्ववत सहकारी क्षेत्र भरभराटीला येऊन त्या वृक्षाच्या फांद्या सर्वत्र पसरू लागतील. लोकांचा विश्वास बसेल. त्याप्रमाणे तुका मेंबरनाही जयसिंगअण्णा सारख्या व्यक्तीला राजकारणात सहभागी करायचे होते. कारण त्यांचा विश्वास

होता. जयसिंग अण्णांसारखे प्रामाणिक व्यक्तीच असे क्षेत्र स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतील. या संदर्भात तुका मेंबर म्हणतात, ''आता या घाणीत त्यातल्या त्यात माणसं हुडकून त्याना संधी द्यायला पाहिजे. असं दहा-पंधरा वर्षे करत राहिलं तर कुठंतरी स्वच्छ पाण्याची आशा धरता येईल. आणि मला अजूनही आशा आहे. राजकारणात आहे या सिस्टीममध्ये जिथे संधी मिळेल तिथे तुम्ही लोकांनी चांगली माणसं ढकलली पाहिजेत. ती आत जाऊ लागली तर मग घाण हळूहळू कमी होईल.... हे इंजेक्शन दिल्यासारखे एकदम त्याचा परिणाम दिसणार नाही. पण वनस्पती औषधागत हळूहळू पण कायमचा गुण मात्र येईल. त्याची सुरूवात गावपातळीपासूनच झाली पाहिजे. मग पंचायत असो, सोसायटी असो, कामाची जयसिंग अण्णा सारखी सर्वसामान्य माणसात ज्याची ऊठबस आहे. अगदी शिपाई असला तरी तो माणूस म्हणून त्याला सांभाळून नेतो..... आणि मुख्य म्हणजे जातपात बघत नाही अशी माणसं पाहिजेत.''[११] लेखकांनी सहकार सुधारण्यासाठी वापरलेली वनस्पती औषधाची उपमा अतिशय योग्य आहे. तसेच कोणतेही कार्य करताना ते स्वतःपासून तसेच कोणत्याही घटनेच्या मुळापासून करणे आवश्यक आहे. सरळ टोकाला जाऊन त्यावर उपाय करून चालणार नाही. तसेच राजकारणातील प्रत्येक माणूस हा गरीब लोकांचे दुःख जाणणारा असावा म्हणजे सर्वांचे कल्याण होईल. सध्याच्या काळात सहकारी संस्थांची अवस्था काय आहे? त्यातील कारभार कशा पद्धतीने चालला आहे? त्यावरती कोणत्या लोकांची मक्तेदारी आहे. प्रत्यक्ष ज्यांच्या नावे संस्था उभारल्या, ज्यांच्या संघटनामुळे ते शक्य झाले त्या शेतकऱ्यांना संस्थेत काय महत्व आहे. याचे वर्तमानवास्तव अतिशय मोजक्या शद्वात 'साखरफेरा' मध्ये 'मोहन पाटलांनी' शद्वबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३) शेतकरी संघटना :-

पूर्वीपासून शेतकरी अनेक संकटांना सामोरे जात धैर्याने उभा आहे. त्यांच्यावरती जीवघेणी कितीतरी संकटे आली परंतु त्यांच्याकडे कधीच कोणी सहकार्याच्या भूमिकेतून बघितले नाही. त्यांच्या कष्टाचे कधीच चीज झाले नाही. पूर्वीपासून आजपर्यंत देश एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना देखील शेतकरी आहे त्याच अवस्थेत आहे. दुसरीकडे मात्र



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

देशाची प्रगती होण्यासाठी सरकार उद्योगधंद्यांना पायघड्या घालते. विविध सुविधा उपलब्ध करून देते. का तर देशाचा विकास झाला पाहिजे. परंतु आपल्या देशातील ७० टक्के लोक शेती करतात. त्या शेतकऱ्यांच्यासाठी मात्र सरकार काहीच सुविधा उपलब्ध करत नाही. शेतकरी बांधवांचा विकास झाला तरच देशाचा विकास होऊन अर्थव्यवस्थेत भर पडेल. असा कधी कोणी विचारच केला नाही. या संदर्भात मोहन धारिया म्हणतात, ''उद्योगधंद्यांना कोट्यावधीच्या सवलती देणारे सरकार शेतीला मात्र उद्योगधंदा म्हणून मानण्यास तयार नाही आणि त्याची उपेक्षा करण्यामध्ये त्यांना काहीही वाटत नाही. ही परिस्थिती बदलली नाही, तर न्यायासाठी जबरदस्त संघर्ष करणे उत्पादक शेतकऱ्यांना अपरिहार्य होईल.''[२०]

शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू, खते, बियाणे, किटकनाशके, माफक दरात मिळतच नाहीत. शिवाय ती उत्तम दर्जाचीही नसतात. शेतकऱ्यांच्या कोणत्याच मालाला योग्य दर नाही. शेतकऱ्यांनी कष्ट करून उत्पादन केलेल्या मालाला शेतकऱ्यांकडून विकत घेताना दर नाही. उलट तोच माल पुन्हा व्यापाऱ्यांकडून घेताना दर वाढलेला असतो असे का? व्यापाऱ्यांनी त्या मालासाठी काय कष्ट घेतलेत म्हणून त्यांना फायदा द्यायचा. शेतकऱ्यांच्या कोणत्याच गोष्टीला विमा योजना नाहीत. अथवा नुकसान भरपाई नाही. शेतकऱ्यांच्याच हितासाठी, प्रगतीसाठी शेतकऱ्यांनीच निर्माण केलेल्या सहकारी संस्था त्यांच्या फायद्याच्या राहिल्यात का? सरकारकडून ज्या थोड्याफार योजना शेतीसाठी राबविल्या जातात. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाहीत. मध्येच गप्प होतात ठिक-ठिकाणचे अधिकारी शेतकऱ्यांना फसवितात. त्यांच्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणतेच काम करत नाहीत. बँकामधून कर्ज घेताना शेतकऱ्यांकडून त्यांची लाखो रूपयाची मालमत्ता तारण म्हणून घेतली जाते. त्यांना कोणत्याही बँकेत क्रेडीट नसते. त्यामुळे दोन जामीनदार आणल्याशिवाय त्यांना कर्ज मिळत नाही. शहरामध्ये सर्व सुख-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. शेतकरी ज्या खेड्यात राहतो तिथे मात्र पाणी, वीज सुद्धा उपलब्ध नसते इतर सुविधा तर दूरच. जो शेतकरी आपल्या सर्वासाठी अन्न पिकवतो त्याचा थोडासाही विचार कोणी करत नाही. तो व्यवस्थित असेल तरच तो धान्य पिकवू शकतो. नाहीतर एक दिवस अशी वेळ येईल सर्वांनाच छोट्याशा पावाच्या तुकड्यासाठी

रांगेत उभे रहावे लागेल. अशा अनेक गोष्टींवरती होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्वतःचे हक्क मिळविण्यासाठी स्वतःची प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघटना निर्माण केली पाहिजे. या संदर्भात प्र. बा. भोसले म्हणतात, ''अर्थात ध्येय धोरणे कोणतेही असले तरी लोकशाहीत जोपर्यंत एखादा घटक संघटित होऊन आपल्या न्याय्य हक्काविषयी आपला समर्थ आवाज उठवू शकत नाही. राज्य सत्तेवर त्याचा प्रभाव पडत नाही, त्याची जरब वाटत नाही तोपर्यंत त्या घटकाच्या नावाने कितीही योजना आखल्या व पार पाडल्या तरी त्यांचे पुरेपूर फळ त्या घटकाच्या पदरात पडत नाही.''[२१]

यासाठी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन संघटना निर्माण केली पाहिजे. याचप्रमाणे 'साखरफेरा' मध्येही शेतकऱ्यांनी ऊसाला योग्य दर मिळण्यासाठी शेतकरी संघटना निर्माण केली आहे. अहोरात्र सर्वांनी कष्ट करून शासन यंत्रणा हलवून ऊसाला योग्य दर आपल्या पदरात पाडून घेतला आहे. हे एकट्या दुकट्या शेतकऱ्याला शक्य नव्हते. या सर्वाचे श्रेय शेतकरी संघटनेला जाते म्हणून शेतकऱ्यांनी संघटित झाल्याशिवाय त्यांच्या मालाला योग्य भाव मिळणार नाही. त्यांचा आर्थिक दर्जा उंचावणार नाही. आत्महत्येचे सत्र थांबणार नाही. तसेच सर्वांना शेतकरी संघटनेचे महत्व, एकजुटीची ताकद समजणार नाही. म्हणूनच आंबेडकरांनी दलितांना दिलेला शिका संघटित व्हा संघर्ष करा हा मुलमंत्र शेतकऱ्यांनीही स्वीकारला पाहिजे आणि आपले अलौकित्व समाजात निर्माण केले पाहिजे.

'साखरफेरामध्ये' मोहन पाटील यांनी ऊसाला योग्य भाव मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटना केली होती. काही झाले तरी चालेल परंतु ऊसाला टनाला पहिला हप्ता आठशे आणि अंतिम दर बाराशे मिळाल्याशिवाय ऊस कारखान्याला घालवायचा नाही. कारखान्याकडून दराची लेखी हमी घेतल्याशिवाय ऊस कारखान्याला पाठवायचा नाही. गावपातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत एकच ठाम निर्णय सर्वांनी घेऊन शेतकरी एकजूट झाला पाहिजे. शेतकऱ्यांची ताकद जगाला दाखवून देण्याची गरज होती. सर्व शेतकरी संघटित झाले तरच ऊसदराचा जटिल प्रश्न सुटणार होता. यासाठी सर्व शेतकरी एकत्र येऊन संघटित झाले आणि त्यांनी सर्व कारखान्यांविरूद्ध आंदोलन उभे केले. या संदर्भात संघटनेचे नेते

भानुसिंग म्हणतात, ''शेतकऱ्यांनो अफवांवर विश्वास ठेवू नका. कोणाच्या खोट्या आश्वासनाला बळी पडू नका कसल्याही मोहाला भीक घालू नका. ऊसाच्या बिलाला लेखी हमीचा करार कारखान्याने संघटनेशी केल्याखेरीज एकाही शेतकऱ्याने आपला ऊस कारखान्याला पाठवायचा नाही. कारण आता आपल्या अस्तित्वाचा, जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही संधी सोडायची नाही.''[२२]

अशाप्रकारच्या सुचना देऊन शेतकऱ्यांचे मनोबल मजबूत केले जात होते. त्यामुळे संघटनाही कणखर होत होती. परंतू प्रश्न होता ज्यांनी स्वतःच्या हातांनी कारखान्याचा वटवृक्षाचे रोपटे लावले ते वाढवले. त्यांचेच नुकसान करायला हे शेतकरी का उभे राहिले. या संदर्भात नितीन देशपांडे म्हणतात, ''व्यवस्थापनात पारदर्शकता आणि व्यावसायिकता आली पाहिजे. औद्योगिक कंपन्या ही ज्या पद्धतीने त्यांच्या भागधारकांना लाभ करतात तसाच लाभ शेतकऱ्यांना झाला तर कशाला शेतकरी रस्त्यावर उतरून आपल्याच कारखान्याविरूद्ध उभा राहिल? तो कारखाना त्यांचाच आहे. या विश्वास देणाऱ्या नेतृत्वावरचा त्याचा विश्वासच हरवला आहे. तो विश्वास परत मिळवणं हेच संचालकांना करायचं आहे.''[२३]

संघटनेचा प्रमुख नेता भानुसिंग होता. संघटनेचे जिल्ह्याचे ऑफिस बोरीगावात होते. तिथूनच जिल्हाभर संघटनेची हालचाल चालू होती. तसेच इतर जिल्हे आणि संपूर्ण महाराष्ट्राशीही त्यांचा संपर्क होता. भानुसिंगला बोरीगावचे केंद्र बळकट करायचे होते. म्हणून तो आपल्या गावातील शेतकऱ्यांना वेगळ्या पद्धतीने तयार करत होता. या सर्व गोष्टींचा त्याने गेली दहा वर्ष अभ्यास केला होता. अनेक संघटनाना त्यांच्या कार्यक्रमांना भेटी दिल्या होत्या व नंतरच संघटना निर्माण करून पूर्ण तयारीनिशी आंदोलन छेडले होते. काहीही करून त्याला या प्रश्नाचा शेवट लावायचा होता. भानुसिंगच्या संघटनेच्या तयारी संदर्भात लेखक मोहन पाटील म्हणतात, ''संघटनेच्या नेत्याने भानुसिंगने तर चार जिल्ह्यात थैमान सुरू केलेले. त्यातही बोरीगावच्या पंचक्रोशीत त्याने अपूर्व रान पेटवले होते. ऊसकरी शेतकऱ्यांचा तो प्रमुख आधार बनला होता. ऊसाला दर मिळाला तर भानुसिंगमुळेच मिळेल, बाकी कोणीही पुढारी उपयोगाचा नाही. अशी पक्की खात्री सामान्य शेतकऱ्यांना वाटत होती. आणिं गावोगावच्या

सभांतून होणारे त्याचे भाषण ऐकून वाचून शेतकऱ्याच्या मनात विश्वास बळकट होतेला. भानुसिंग आता खरोखरीच पेटला होता. त्याला या प्रश्नाचा शेवटच लावायचा होता. म्हणून त्याच्या शब्दाला धार चढली होती.''[२४] त्याची भाषणे ऐकून शेतकरी मंत्रमुग्ध होत होता. त्यांना दुसरे काहीच सुचत नव्हते असे वातावरण भानुसिंगच्या ऊस आंदोलनाच्या भाषणाने तयार झाले होते. प्रत्येकाच्या अंगात तरतरी आलेली होती. छातीत धाडस भरलं होतं. सर्वजण जोमाने तयारीला लागले होते. काहीही झाले तरी आंदोलन मागे घ्यायचे नाही असा सर्वांनी ठाम निर्णय घेतला होता. सर्वांचा संघटनेला एकजूटीने पाठिंबा होता. वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचून प्रत्येकाने कंबर कसली होती. प्रत्येकजण तावातावाने बोलत होता. या संदर्भात मोहन पाटील म्हणतात, ''शेतकरी म्हणजे झाडाचा पाला वाटला व्हय? हळूहळू मरण्यापेक्षा एकदम मरूया! आनाला मारून तुमी कसं जगता? कारखान्याची चिमणी बंद पाडायची ताकद हाय ह्या दंडात. ज्यो ऊस तोडलं त्येला फडातच बुकलायचा व्हय. नाद करायचा न्हायी. आमच्या जीवावर गाड्या उडिवता व्हय? आमचा प्रश्न आमी सोडवू. आमच्यावर काय दर देऊन म्हैरबानी करत्यात? हेंच्या खुर्चीलाच हात घालाय पायजे एकडाव. एकडाव हिसका दावूयाच. दहा मुखांनी भडकलेल्या अग्निज्वाला बाहेर पडत होत्या. त्या धगीने परिसर तापत होता. रक्ताचा कण नि कण पेटत होता.''[२५] या शेतकऱ्यांच्या बोलण्यातून कारखाना प्रशासन व अधिकाऱ्यांच्या विरूद्ध बंडखोरी उद्वेग, आत्मभान जागृत झाल्याचे जाणवते.

संघटनेच्या ऑफिसमध्ये बसलेल्या भानुसिंगने जमलेल्या सर्व शेतकऱ्यांना सूचना दिल्या तो म्हणाला ऊस तोड सोमवार पासून चालू होणार आहे. चार दिवसापूर्वीच ऊस टोळीवाले आले आहेत. रात्रीचीच ऊस तोड करून कारखाना डोळ्यात धुळ फेकेल. गेली दहा पंधरा दिवस रात्रंदिवस घेतलेले कष्ट वाया जातील त्यामुळे त्या रात्री पासूनच प्रत्येकाने आपआपल्या भागात गस्त सुरू करायची. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवायचा नाही. संघटना ज्यावेळी स्वतः दराचा निर्णय जाहीर करेल, पेपरला देईल तेव्हाच विश्वास ठेवायचा. कोणत्याही प्रकारच्या हिंसेचा अवलंब करायचा नाही. सर्व कार्य अहिंसेच्या मार्गाने झाले पाहिजे. त्यात कोणताही घोटाळा होता कामा नये. शहाजी पाटील, बाबू सटाले, अण्णा सटाले, किशा खोत,

शामा कोळी, बाळा मगदूम, परिसा मगदूम, आप्पा धनगर, गुंडा–बंडा हे गावातले शेजारच्या जिल्ह्यातले महत्वाचे संघटनेचे कार्यकर्ते होते. भानुसिंगने वारंवार सर्व कार्यकर्त्यांना योग्य सूचना देत असे भानुसिंग म्हणे, ''ही आपली सत्वपरीक्षा आहे. साऱ्यांनी जोर लावून हे आंदोलन यशस्वी केलं तर मी खात्रीनं सांगतो, आम्ही म्हणतो तेवढा ऊसाला दर जाहीर करावाच लागेल. घामाचा पैसा पदरात पडेल. कोणाही शेतकऱ्यानं परस्पर निर्णय घ्यायचा नाही. जे ठरलंय तसं लोकशाही मार्गानं आपला हक्क मागायला आम्ही रस्त्यावर उतरलोय. या आंदोलनात जर काही नुकसान झालंच तर त्याची सर्व जबाबदारी साखर कारखान्याची आहे. आम्हांला भीक नको आहे. कष्टानं पिकवलेल्या आमच्या ऊसाला योग्य दर पाहिजे. आणि तो आम्ही स्वाभिमानानं मागतोय.''[२६] भानुसिंगच्या वेळोवेळच्या या सूचनांनी सर्वांची मने घट्ट होत होती. संघटनेशी प्रामाणिकपणा व ऊसाला योग्य दर याशिवाय कोणाच्या डोक्यात दुसरा काही विचार नव्हता. विद्रोहाने, स्वतःच्या हक्काच्या प्रश्नाने त्यांची मने पेटून उठत होती. इतकी वर्ष भोगलेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करत होती.

महाराष्ट्राचे संघटना उपाध्यक्ष तानाजी शेटे यांची शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सभा बोलावली होती. अचानक सभा बोलवली असून देखील शेतकरी मोठ्या संख्येने सभेला उपस्थित होते. एवढी एकजूट शेतकऱ्यांमध्ये या संघटनेमुळे निर्माण झाली होती. आणि हिच एकजूट कोणत्याही सत्तेला, हक्काला विरोध करायला पुरेशी होती. तानाजी शेटे यांनी आपले भाषण सुरू करताच सर्वत्र शांतता पसरली. प्रत्येकजण तानाजी शेटे यांना पाहण्यासाठी व त्यांचे भाषण ऐकण्यासाठी उत्सुक होता. तानाजी शेटे म्हणाले, ''रक्ताचं पाणी करून आपण पीक घेतो आणि सोन्यासारख्या आमच्या शेतमालाला योग्य भाव द्या म्हटलं तर त्यांच्या पोटात गोळा उठतो. मित्रांनो! आपण सर्वशक्तीनिशी आपली ऊस दराची मागणी खेचून आणूया. आमच्या ऊसाला योग्य भाव का मिळत नाही. कारखानदार सांगतात, साखर धोरण बदललं, खुली अर्थव्यवस्था आली, स्पर्धा वाढली की कारखाना तोट्यात चालवावा लागतो. मी तर म्हणतो, हे साफ चुकीचं आहे. कारखाना नीट चालवता येत नाही. ऊसाला योग्य भाव देता येत नाही. आणि तोटा होतो, तर मग खुर्च्यांना फेव्हीकाल लावून चिकटून का बसलाय अजून?

सोडा की खुर्च्या. शेतकऱ्यांच्या ताब्यात कारखाना द्या. आम्ही शपथेवर सांगतो, तो उत्तम चालवू आणि ऊसाला बाराशे रूपये दर देऊन दाखवू.....''[२७] तसेच याच संदर्भात नागनाथ कोतापल्ले यांनी 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध' या पुस्तकात आंबेडकरांचे विचार मांडले आहेत. आंबेडकरांनी कोकणातल्या शेतकरी मोर्चासमोर भाषण करताना सांगितले की, ''तुम्ही सगळे शेतकरी म्हणून एकत्र या, शेतकरी म्हणून एकजूट करा. तुम्ही जाती जातीत विभागले गेला की तुमचे बळ कमी होईल. डॉ. आंबेडकरांनी ग्रामीण शोषणाची दोन रूपे ध्वनित केली आहेत. एक अर्थव्यवस्थेने केलेले शोषण आणि दुसरे वर्ण जाती व्यवस्थेने केलेले शोषण अशा दुहेरी शोषणात सापडलेला शेतकरी खेड्यातला कष्टकरी माणूस मराठी साहित्यात मात्र केवळ उपहास आणि विनोद निर्मीतीचाच धनी बनला.''[२८] सर्वांनी ठाम निर्णय घेऊन गरीब शेतकऱ्यांच्या तोडचा घास पळविणाऱ्या या भ्रष्टाचारी, मस्तवाल, लोकांना योग्य धडा शिकवला पाहिजे वेळीच त्यांना धडा शिकवला तर हाताबाहेर गेलेली परिस्थिती आटोक्यात येईल. नाहीतर दिवसेंदिवस परिस्थिती बिघडून सर्वत्र भ्रष्टाचाराचे साम्राज्य वाढेल. आणि पुन्हा काहीही करता येणार नाही. फक्त हातावर हात धरून, मनातील राग मनातच दाबून ठेऊन त्यांची वर्तणूक पहात बसावी लागेल. या सर्व गोष्टी टाळण्यासाठी शेतकरी एकजूट होऊन त्यांनी संघटना निर्माण करून विरोध केला पाहिजे त्याला पर्याय नाही.

ऊस संघटनेचे वातावरण तापू लागले होते. सर्वत्र कार्यकर्त्यांची पळापळ चालू होती. रस्त्या रस्त्यावरती सर्व शेतकरी उभे होते. रस्तारोको करून आंदोलन करत होते. काही जरी झाले तरी कारखान्याला ऊस जाऊ द्यायचा नाही. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानांवरती राज्यभरातील आंदोलनाच्या सर्व बातम्या प्रसिद्ध होत होत्या. पुणे बेंगलोर महामार्ग बंद पाडला. रात्री पोलिसांचा फौजफाटा गेल्यावरती आंदोलक तिथून बाजूला सरकले. काहीना अटक झाली. महामार्ग पोलिसांनी मोकळा केला. तरी गावोगावी शेतकरी आपल्या हक्कासाठी रस्त्यावर येऊन संताप प्रकट करत होते. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या चार जिल्ह्यात आंदोलनाचे स्वरूप उग्र होते. कायदा आणि सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झाल्यावर पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. जागोजागी पोलिसांची गस्त सुरू होती. कारखान्याच्या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आसपास संरक्षक व्यवस्था ठेवण्यात आली होती. पोलिसगाड्या सर्वत्र धावू लागल्या होत्या. रामा फडतऱ्याच्या ऊसात कारखान्याची टोळी सकाळी उतरली हे आंदोलकाना समजताच संघटनेचे असंख्य शेतकरी फडतऱ्याच्या ऊसाच्या रानात गेले. त्यांनी ऊसतोड थांबवली. त्याना हाकलून लावले. रामा फडतरेने खवळलेली जनता पाहून ऊसाच्या फडात घुसून पळून गेला. ऊस तोड बंद झाली.

बोरीगावच्या ऑफिसमध्ये कार्यकर्त्यांची गर्दी झालेली होती. ऑफिसबाहेर हजार लोक जमलेले. आंदोलन यशस्वी झालेल्या बातम्या प्रत्येकाला समजल्या होत्या. त्यामुळे प्रत्येकजण उत्साही होता. विजयाची भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून ओसंडून वहात होती. आत ऑफिसमध्ये भानुसिंग आपल्या महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना हळू आवाजात दक्षतेबद्दल काही सूचना सांगत होता. या आंदोलनामुळे एका रात्रीत कायदा आणि सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर झालेला. सर्वत्र पोलिसांचा बंदोबस्त वाढलेला. अशा परिस्थितीत आंदोलन कशा पद्धतीने चालवायचे यासंबंधी तो कार्यकर्त्यांना दक्षतेच्या सूचना सांगत होता. बोरीगाव, लाटेवाडी, पाडळी, मनवाड, सावळी, चिंचलीपर्यंत सर्वच भागातून ऊसक्षेत्र कार्यकर्त्यांच्या फळ्या तयार केलेल्या. त्यांना जागरूक राहण्याचा इशारा दिलेला. आजचा दिवस खूप महत्वाचा आहे. हितून पुढचा प्रत्येक दिवसही महत्वाचा आहे. शेतकरी किती दिवस तग धरून राहतो यावर सर्व अवलंबून आहे. दोन तीन दिवस आंदोलन चालवतील मग शांत बसतील असा कारखान्याचा ग्रह होता तो शेतकऱ्याना चुकीचा ठरवायचा आहे. ऊस वाळू दे. पण कारखाना जास्तीत जास्त दिवस बंद पडला पाहिजे. सगळी यंत्रणा ठप्प झाली पाहिजे तरच साखरेच्या दराच्या प्रश्नाबाबत वरच्या पातळीवर तातडीने इलाज होईल. म्हणून सर्वांनी जिद्दीने, चिकाटीने कार्य पार पाडायचे मागे हटायचे नाही. अशा सूचना सर्व आंदोलकांना ओरडून सांगू लागला. ते ऐकताच जिव्हाळ्याच्या प्रश्नाने पेटून उठलेले तिथले आंदोलक आपल्या गटातील लोक घेऊन बाहेर पडू लागले. आंदोलनाच्या कामगिरीवर वेगात निघाली. तरी शंभर एक कार्यकर्ते तिथे होतेच. एवढ्यात शहाजी पाटलांना फोन आला. तो भंगाटे संचालकांचा होता. संचालक तडजोड करूया म्हणत होता. ऊस वाळाय लागलाय कोणाचेच नुकसान नको परंतु हे भानुसिंगला मान्य नव्हते तो ऑफिसमधून बाहेर कट्ट्यावर आला आणि सर्व माणसांना ओरडून सांगू लागला. कारखान्याचे काही हितचिंतक

शेतकऱ्यांना खोट नाटं सांगून शेतकऱ्यांची ताकद कमी करू इच्छित आहेत. कोणी काहीही सांगितले तरी कशावरतीच विश्वास ठेवू नका. शेतकऱ्यांनी सहा महिने जीवाचेरान करून संघटित होऊन केलेले कष्ट सर्व वाया जातील. महिनाभर ऊस वाळला तरी चालेल टनेज थोडं कमी होईल. नाहीतर सरळ गुरांना ऊस तोडून घाला. पण कारखान्याला द्यायचा नाही. कारखाना प्रशासनात असलेले नातेवाईक काहीही सांगतील त्यांच्या गप्पाना भुलू नका, बळी पडू नका. या आंदोलनामुळे फक्त माज्याच ऊसाला दर मिळणार नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळणार आहे. महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची ही चळवळ आहे. मग जोरदार घोषणा झाल्या घोषणा संपताच शामा कोळी पळत संघटनेच्या ऑफिसकडे येताना दिसला. त्याने भानुसिंगला कानात काहीतरी सांगितले ते ऐकून भानुसिंग खूप चिडला. कोणाला बातमी अर्धवट समजली तर कोणाला काहीच कळाले नाही. सर्वजण भानुसिंगच्या मागे पळत सुटले. तिथे जाऊन पहाताहेत तर खुद्द संभा खंदारे बुलेटवरून पुढे होता. मध्ये ट्रॅक्टर होता तर पाठीमागे २०–२५ पोर होती. भानुसिंग आपल्या कार्यकर्त्यांसह आलेला पाहून संभा खंदारे चिडला त्याने बुलेट बाजूच्या रानात सोडून दिली. तशी गाडी दुरपर्यंत जाऊन पडली. तसा खंदारे उडी मारूनच रस्त्यावर आला. त्याबरोबर त्यांच्या कार्यकर्त्यांचा ताफाही पळत आला. तशी भानुसिंग व संभा खंदारे यांच्या कार्यकर्त्यांच्यात हाणामारी चालू झाली. या हाणामारीत बऱ्याच जणाना दुखापत झाली. मुकामार लागला. संभा खंदारेच्या इशाऱ्यावरून त्यांच्या कार्यकर्त्यांनी भानुसिंगला एकटे गाठून मारायला सुरूवात केली. मारता मारता काठी भानुसिंगच्या डोक्यात बसली तशी रक्ताची चिळकांडी उडाली. रक्त पहाताच सर्व कार्यकर्ते बिथरले. काठ्या टाकून सर्वजण पळत सुटले. कार्यकर्त्यांनी भानुसिंगला पाडळीच्या पाटील डॉक्टरांकडे नेले. थोड्याचवेळात वातावरण एकदम शांत झाले. भानुसिंगने चालवलेले कार्य संभा खंदारे इत्यादी मंडळीना मान्य नव्हते. म्हणून कारखाना प्रशासनातील सर्वांचा डोळा भानुसिंगवरती होता. कारण त्यांच्यामते या सर्व शेतकऱ्यांना उकसविण्याचे काम भानुसिंगच करीत आहे. भानुसिंग शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करीत आहे. परंतु ते इतरांना मान्य नाही. कारण भानुसिंग सर्व शेतकरी संघटनेचा नेता झाला आहे. त्याची प्रतिष्ठा वाढली आहे. लोक त्याला मान देऊ लागलेत. थोड्याच कालावधीत तो सर्वांचा खंबीर, तरूण, तडफदार नेतृत्व तसेच आवडता नेता झाला होता. त्याची ही लोकप्रियता

इतराना मान्य नव्हती. त्यामुळे रागाच्या भरात संभा खंदारेच्या इशाऱ्यावरून त्याच्या कार्यकर्त्यांनी भानुसिंगला एकटे गाठून त्याला मारहाण केली. या संदर्भात 'खांदेपालट' या कादंबरीत मोहन पाटील म्हणतात, ''खेकडा काय करतोय म्हायीत हाय? डालग्यात त्यो एकटा असला तर चटक्यात वर येतोय. पर तिथं एकाला दोन खेकडं असलं तर काय करत्यात ठावं हाय? एकटा वर निघाला, की दुसरा त्याचा पाय वडून त्येच्या अंगावरनं आपून वर जायाला बघणार. ह्या वडावडीत दोनीबी खेकडं डालग्यात पडणार ती कधीच वर निघणार न्हायीत तर आमच्या म्हराठ्या समाजाची गत अशीच हाय आसं तऱ्हंवाईक हाय आपल्या माणसांच.''[२१] मोहन पाटील यांनी मराठा समाजासाठी खेकड्याची योजलेली उपमा योग्य आहे. कारण मराठा समाजात अशीच अवस्था आहे. एखादा पुढे निघाला तर दुसऱ्याला ते बघवत नाही तो त्याला पाठिंबा न देता तो पुन्हा पाठीमागे कसा येईल याविषयी कुरघोड्या करत बसतो. आपलाच भाऊबंद पुढे गेलेला त्याला बरे वाटत नाही. त्यामुळेच मराठा समाज पाठीमागे राहिला आहे.

चिंचली गावातील रानात वस्तीजवळ बंदोबस्तासाठी पोलिस गाडी घेऊन आले होते. उगीचच इकडून तिकडून फिरत होते. फिरता फिरता रस्त्याने निघालेल्या एका व्यक्तिला थांबवून त्यांनी काठीने मारले आणि एका आंदोलकाचा पत्ता विचारला. तो शेतकरी घाबरला. त्याला पोलिसांनी सोडताच. तो गावात पळत सुटला आणि सर्वांना घडलेली हकिकत सांगितली. हे समाजताच ज्या मळ्यात पोलिस फिरत होते. तिकडे माणसांचा घोळका पळत सुटला. जमावाने पोलिस गाडीवरती हल्ला केला. हल्ला इतका अचानक होता की पोलिसांना काहीच समजले नाही. गाडी तिथेच सोडून ते पळून गेले. मग खवळलेल्या जमावाने पेट्रोल ओतून ती गाडी पेटवून दिली. पोलिसांना बेदम मारहाण करून पळवून लावले. मग रात्री अचानक अकरा-साडेअकरा वाजता झोपेच्या आधीन होऊ लागलेल्या चिंचली गावावर अक्राळविक्राळ खाकी वादळ येऊन थडकले. त्या वादळाचा तडाखा एवढा होता की, त्याने चिंचली गावाची पांढरी हादरली. गावभर गोंधळ सुरू झाला. पोलिसांनी दिसेल त्याला मारायला सुरूवात केली. अंधारात आडोशाला लपून बसलेल्या लोकांना हुडकून त्यांना बाहेर ओढून रस्त्यावर फरफटत आणले. लाथा बुक्या हाणून त्याना तुडवले. कोणाविषयी दया दाखविली नाही. हुरड्याची कणसं

झोपडावीत तशी माणसे झोडपून काढली. आणि वादळ आले तसे निघून गेले. सर्वत्र शांतता पसरली. आवाज होता तो फक्त लोकांच्या विव्हळण्याचा हे सर्व घडण्यापाठीमागचे कारण म्हणजे चिंचली गावातील लोकांनी पोलिसांवर केलेला हल्ला होय. याचा परिणाम म्हणजे चिंचली गावात सोसाट्याचे वादळ हा–हा म्हणता शिरले सर्व गावाला दुखापत करून लोकांना वेदना देऊन निघून गेले.

तिसऱ्याच दिवशी चिंचणी गावची हिंसक बातमी वर्तमान पत्रातून झळकू लागली. ऊस आंदोलनाला हिंसक वळण मिळाले. त्यामुळे सर्वत्र वणवे पेटू लागले. जो तो या घटनेविषयी निषेध व्यक्त करू लागला. निरपराध, हतबल माणसांवरती, दंडूकशाहीचा पवित्रा वापरल्यामुळे असंतोष भडकला. तो गल्लीपासून दिल्लीपर्यंत जाऊन पोहचला. सरकार बरखास्तीच्या गगनभेदी आरोळ्या उठल्या संसदभवन डळमळू लागले. खुर्च्या हलू लागल्या. निरपराध शेतकऱ्यांच्या कळवळ्यातून प्रकटलेला अग्नी देशभरातील सर्व सरकारी यंत्रणा गिळंकृत करायला वायु वेगाने धावला. या संदर्भात मोहन पाटील म्हणतात, ''युगानुयुगे मातीच्या गर्भागारात गाडून टाकलेला तो पुन्हा सर्व शक्तीनिशी भूमीवर प्रकट झाला होता. आणि हातातला प्रचंड नांगर आभाळाइतका उंच उचलून शत्रूंची नगरेच्या नगरे उखडून टाकायचा पवित्रा घेत होता. त्याची ती थरकाप उडवून देणारी भयानक मुद्रा पाहून लालफितीतले कागद फडफडू लागले. उच्चासनाचा थरकाप उडाला. यंत्रणेची चाकं मग भयंकर फिरू लागली.''[३०]

शेतकऱ्यांच्या कष्टाचे चीज झाले. दिल्लीमधून सर्व यंत्रणा गरागर फिरून निर्णय जाहीर झाला. ऊस उत्पादकांसाठी केंद्राकडून भरघोस मदत जाहीर झाली. उन्हाने तापलेल्या धरणी मातेला पावसाचे चार थेंब पडल्यावरती ज्याप्रमाणे शांतता प्राप्त होते. चातक पक्षी पहिल्या पाऊसाच्या थेंबानी तृप्त होतो त्याचप्रमाणे या एका निर्णयाने सर्वत्र शांतता पसरली, उत्साहाचे आनंदाचे वातावरण तयार झाले, केलेल्या श्रमाला, घेतलेल्या कष्टाला यश आले. शेतकऱ्यांनी केलेल्या संघटनेमुळे त्यांना न्याय मिळाला. 'एकीचे बळ मिळते फळ' याचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले.

४) ऊसपीक प्रगती :-

महाराष्ट्रात साखर कारखाने उभे राहिल्यापासून ज्वारी, तूर, तंबाखू ही सोन्याच्या मोलाची पीक होती ती आभाळात उडून गेलीत. ऊसासारख्या नगदी पीकापासून शेतकऱ्याला रोख रक्कम मिळू लागली. दराचा प्रश्नच नव्हता. दर कारखान्याकडे ठरलेला. उत्पन्न फक्त काढायचे. परंतु इतर पिकाचे तसे नव्हते. उत्पादन जरी भरघोस काढले तरी त्याला बाजारात योग्य दर मिळेलच असे नाही. त्यामुळे ऊसपीकच सर्वांना फायद्याचे वाटते. कारखाने निर्माण झाल्यापासून पुढाऱ्यांनी प्रोत्साहन द्यायला सुरूवात केली. पाणी सोसायट्या काढल्या, नदीवरती मोठी जॅकवेल बसवलीत. मोकळ्या माळावरती पाटाने पाणी नेल्यामुळे सर्वत्र हिरवेगार दिसू लागले. जिथे कुसळाशिवाय काही उगवत नव्हते तिथे सर्वत्र हिरवीगार पिके डोलू लागलीत. सगळीकडे पाणी आल्यामुळे ऊसच ऊस दिसू लागला. त्यामुळे फाटक्या कुणब्याच्या हातात कधी नव्हे तो पैसा खेळू लागला.

बहात्तर साली मोठा दुष्काळ पडला त्याआधी म्हणावे इतके ऊसाचे पीक सर्वत्र नव्हते. पुढे दोन-तीन वर्षांनी चांगला पाऊसकाळ झाला. ऊस चांगला पिकला कारखान्याने ऊसाला दरही चांगला अडीचशे रूपये दिला. त्यावर्षी ऊसाला सोन्याचा भाव मिळाला. कितीतरी लोकांनी त्या वर्षी चाळीस-चाळीस तोळे सोनं खरेदी केले. मोहन पाटील या संदर्भात म्हणतात, ''साऱ्याचं सोनं झालं. ऊस सोन्याचा झाला. त्या साली कमळावर बसलेल्या लक्ष्मीच्या चार हातांपैकी एका हातात हिरवागार उंच ऊस होता. ऊस लक्ष्मी झाला. खरं त्या कॅलेंडरचं रंग विटलं आता. आता सारं कडूजार झालं.''[३१]

ऊसाचा गोडवा कमी होऊन सर्वत्र कडूतेचे साम्राज्य माजले. शेतकरी ऊसाचे उत्पादन विक्रमी काढत होते. परंतु तिथून पूढच्या प्रक्रियेमध्ये सर्व अंधाधुंदी कारभार, भ्रष्टाचार बोकाळला होता त्यामुळे ऊस कारखान्याला पाठविण्यासाठी शेतकऱ्यांना खूप त्रास होत असे तसेच नंतर-नंतर कारखाना योग्य दरही देत नव्हता. अजूनही ऊसातून भरपूर पैसे शेतकऱ्यांना मिळू शकतात. परंतू कारखाना प्रशासन कारखान्याशी संबंधित लोक राजकारण, ऊसाला आवश्यक खते, बियाणे, किटकनाशके या गोष्टीमुळे ऊस पीक अडचणीत आले आहे. लोकांचे ऊसाविषयीचे प्रेम कमी झाले आहे. ते पूर्वी सारखे हुकमी राहिले नाही. आता तर वेळेवरच नाही तर, कारखाना बंद होईपर्यंत

कारखान्याला जाईल का नाही याचीही धास्ती ऊस कारखान्याला जाईपर्यंत लागून रहाते. त्यामुळे ऊस पीकही आता भरवशाचे राहिले नाही.

किशालाही ऊस पीकाची खूप ओढ होती. परंतु त्याला ऊस पीक साधत नव्हते. तरीही ऊसाचा नाद त्याच्या डोक्यातून बाहेर पडत नव्हता. चार पाच वर्षापाठीमागे किशाने ऊस लावला तेव्हा पाऊस जास्त झाल्यामुळे रान गारठलं, त्यामुळे लावण कुचंबली. पावसाचा अंदाज कधीच कोणाला लागत नाही. तो बेभरवशी असतो जेव्हा पिकाला पाण्याची आवश्कता असते तेव्हा पडत नाही. आणि जेव्हा गरज नसते तेव्हा धो–धो पडतो त्यामुळे चांगल्या पिकाचे नुकसान होते. या संदर्भात आनंद यादव म्हणतात, ''पावसाच्या स्वरूपशैलीचा कधी अंदाजच लागत नाही. ही शैली आपल्या बेलाग तालासुरानं खेडुताला मनमानी वृत्तीने नाचवते. कधी त्याचा खुळखुळा करून खेळवते, तर कधी त्याला खिळखिळा करून त्याचा जन्म मोडीत काढते.''[३२] किशाचेही असेच झाले अति पाऊस व नको तेव्हा पडल्यामुळे लावण कुचंबली. तेव्हा पुन्हा लावण केली. तरीही कशाचाच ताळमेळ लागला नाही. दुसऱ्यावेळी तर उन्हातान्हात राबून, भांडवल नसताना ते जमा करून लागण केली ती डोक्याएवढी उंच आणली आणि चार दिवसातच ती कारखान्याला जाणार तोच भर दुपारच्यावेळी तिला आग लागून धडाधडा पेटून राख झाली. त्यामुळे किशाला नेहमी वाटत असे. ऊस पीकाचे गणित आपल्याला जमत नाही. बेरीज नेहमीच चुकते. परंतु खरीपाच्या पिकाने कर्ज फिटणार नव्हते. आर्थिक परिस्थिती सुधारायची असेल तर ऊसाशिवाय पर्याय नाही.

किशाचा भाऊ गजा खोत हा एखाद्या वर्षी पिकाची फेरपालट करण्यासाठी रान रिकामे ठेवतो. नाहीतर दरवर्षी सलग ऊसच असल्यामुळे त्याच्याकडे स्लॅपचे घर, गाडी, कपडालत्ता, दागदागिने, व्याजाने पैसे देणे, प्रतिष्ठा, गोठ्यात हत्ती सारख्या जर्सी गाई, सगळं कसं व्यवस्थित चालल होतं. ज्याला दोनवेळ पोटभर जेवण मिळायची पंचायत होती. त्याच्या घरी आज लक्ष्मी पाणी भरत होती. हे कशामुळे तर वारंवार घेतल्या जाणाऱ्या ऊस पिकामुळे. वर्षानुवर्ष त्याला एका रक्कमेने पैसे मिळत गेले. त्यामुळे तो श्रीमंत झाला. किशा मात्र तसाच दारिद्र्यात अडकून राहिला. कारण ऊसाची आणि त्याची रास जुळली नाही. प्रत्येकवेळी काहीना काही अडथळे येऊन त्याचा तोटाच झाला. त्यामुळे तो दुःखी झाला. गरीबच राहिला. एवढी संकटे आली तरीही किशाचा ऊसाचा नाद

काही सुटत नव्हता. काहीही करून पुन्हा ऊस लावण्याची त्याची जिद्द होती. तसेच आपणही ऊस लावण करून गजासारखे मोठे व्हावे असे त्याचे स्वप्न होते. म्हणून किशा म्हणतो, ''मोठी लोखंडी तिजोरी घ्यायला लागणार. बायजीला सोन्यानं मडवायची. आपूनबी फटफटी घ्याची. पटका चांगला भारीपैकी जरीचा घ्याचा. त्येच्या बायला! पटक्याचा शेमला फटफटीवरनं बसून जाताना. मागं वाऱ्यावर नुस्ता डंग ऊसाच्या तुऱ्यावाणी लहरत ऱ्हायाला पायजे. ते काय नाही, आता गावंदरीत हायब्रीड, भात, गहू करतोय ते सारं कटाप. आता सारा ऊसच लावायचा. साऱ्या मुलुकात ऊस झाला. आपूनच खुळं. फड पेटला म्हणून डोस्क्यात राख घालून ऊस काढून बसलो. चुकच झाली. वर्साला नवं नवं साखर कारखान निघत्यात त्यास्नी ऊस नगो? म्हजे बाकीच्या जित्रापाला जाता किंमतच ऱ्हायी. कारखानं काढायला सरकारला काय खूळ लागलंय? माज्यासारख्याला वर काढायचंच सरकारचं धोरण हाय. पुढारी ऊस करा..... ऊस करा..... म्हंत्यात. नव्या नव्या ऊसाच्या जाती काढत्यात. योजना आखत्यात आता आपूनबी अजिबात मागं ऱ्हायाचं ऱ्हायी.''[३३] काहीही झाले तरी ऊसाची लागण करायची हा विचार किशाच्या मनात पक्का झाला. किशाप्रमाणे इतरही शेतकऱ्यांचे ऊसावरती प्रेम होते. ऊसापासून एकदम आणि हुकमी पैसे मिळतात. यावर सर्व शेतकऱ्यांचा विश्वास होता. त्यामुळे प्रत्येकाला ऊस लावण करायची होती. परंतु भांडवलाअभावी ते शक्य होत नव्हते. आज ना उद्या आपणही ऊस लावण करू हे स्वप्न बाळगून ते जगत होते.

ऊस पिकाची प्रगती ही दिवसेंदिवस वाढतच आहे. एक-एक शेतकरी पाच-पाचशे टन ऊस काढू लागला आहे. ऊस क्षेत्र वाढविण्यासाठी अनेक योजना राबविण्यात आल्या. त्यामुळे ज्यांच्याकडे भांडवलाचा, पाण्याचा अभाव होता. अशा शेतकऱ्यांनीही ऊसाची लागण केली. त्यामुळे ऊस उत्पादनात भर पडली. ऊसक्षेत्र वाढविण्यासाठी अल्पभूधारक शेतकऱ्यांवरती लक्ष केंद्रित केले पाहिजे. तसेच ऊस लागवडीसाठी या शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले तर ऊस क्षेत्रही वाढेल आणि शेतकऱ्यांची गरजही भागेल. शेतकऱ्यांना ऊसाच्या एकर दोन एकर लागणीसाठी खताचे डोस द्यायचे. या योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांची पाणीपट्टी ऊस बिलातून फेडण्याची सवलत द्यावी. तसेच कारखान्याकडून बियाणेही उधार द्यावे. या सर्व गोष्टींचे पैसे शेतकऱ्यांचा ऊस नोंद करून त्यांच्या बिलातून फेडून घ्यावेत. उरलेले पैसे शेतकऱ्याचे शेतकऱ्यांनाच द्यावेत. म्हणजे हातात आलेली लक्ष्मी

पाहून तो पूढच्या वर्षी अधिक उत्पादन काढण्यास उत्साही होईल. लागणीचे पैसे जरी खर्च झाले तरी खोडव्याचे पैसे शेतकऱ्यांना कोणतेही भांडवल न घालता तसेच्या तसे रोख मिळतील. इतर पिकांसारखा ऊस पिकाला त्रास नाही. इतर पिकांची अवस्था खूप वाईट आहे. उत्पादन निघाले तर दर नाही, आणि दर असला तर त्यावर्षी उत्पादन कमी निघालेले असते. काही वेळा तर घातलेला खर्च सुद्धा निघत नाही. त्यापेक्षा ऊस बरा. उत्पादन काढणे हे आपल्यावर अवलंबून असते. दर ठरलेला असल्यामुळे तोटा होण्याचा अथवा दर किती मिळतो याची काळजी घेण्याची गरज नाही. या संदर्भात किशा म्हणतो, ''म्हणून हजार वाट्यानं ऊसच बरा की! बाकीच्या पिकावाणी झडती न्हायी. मळणी न्हायी. वाळवणी न्हायी. पोती भरा, पेठंला लावा असलं काय न्हायी. तेला पाकरंबी खात न्हायीत. राकुळा न्हायी. उना पावसाचं धुकाट पडल्यालं त्येचं बी भ्या न्हायी. चोरचिलटाचं भ्या न्हायी. लावण करायची, पाणी पाजायचं, खतं इस्कटायची झालं. कारखाना तोडून न्हेतोय. त्यो बी घोर न्हायी. उसात काय कामच न्हायी. नुसतं बांधावरनं शेतकी करायची.''[३४]

ऊसाच एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे चार माणसात शेतकऱ्यांची किंमत रहाते. देणेकरी मागेपुढे बघत नाहीत. ऊस जाईपर्यंत वाट पहातात. कर्ज देत नाहीत. बँक ऊस आहे म्हटल्यावर लगेच कर्ज देते. ऊसाला सोन्याइतके महत्व प्राप्त झाले आहे. जो–तो ऊस लावण करण्याच्याच पाठीमागे लागला आहे. किशाला ऊस म्हणजे सोन्याचा जिन्नसच वाटतो. तर शामाला ऊस माझी आई, ऊस माझा बा, ऊस माझा सोयरा आहे असे वाटते.

### ५) ऊसदर प्रश्न :–

सहकारी साखर कारखान्यांमध्ये ऊसदर हा गंभीर प्रश्न झाला आहे. कारण कारखाना प्रशासनाच्या बेछूट वागण्यामुळे कारखाने डबघाईला आलेत. तसेच कर्जबाजारी झालेत. कारखान्याच्या माध्यमातून चालत असणारे इतर प्रकल्पही बंद पडू लागलेत. कारखाना निर्मितीपासून कधीच ऊसावरती खर्च होणाऱ्या भांडवलाचा विचार करून दर दिला नाही. त्यांनी फक्त कारखान्याला किती दर द्यायला परवडतो याचा विचार केला. सर्वच कारखान्यांची अशी अवस्था नाही. ज्या कारखान्यांचे नेतृत्व प्रामाणिक, दुसऱ्यांचा विचार करणारे आहे. ते कारखाने आजही जोमाने चालले आहेत तसेच

विविध योजनांचा अवलंब त्यांनी शेतकरी विकासासाठी केला आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीकडे त्यांचे पुरेपूर लक्ष आहे. हे इतर भागातील लोकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनीही आपल्या कारखान्याना जाब विचारला. इतर कारखान्याना एवढा दर द्यायला परवडतो तुम्हाला का परवडत नाही. जर तुम्हाला परवडत नसेल तर खुर्च्या सोडा आम्ही आमचा कारखाना व्यवस्थित चालवून दाखवू आणि ऊसाला योग्य दर देऊ. या विचारातू शेतकरी एकत्र आले आणि त्यांनी ऊसदर प्रश्नाविषयी संघटना निर्माण करून कारखान्याविरूद्ध लढा निर्माण केला. सतिश तानाजी पाटील म्हणतात, ''ऊसाच्या पिकाचे उत्पादन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाचे वाढते प्रमाण त्यातच खताच्या डिझेल, कीटकनाशके, तणनाशके, टॉनिक, मजुरांची पगारवाढ इ. खर्चाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातच वीजटंचाई, वीज दरवाढ, शेतीवर मीटर बसवून येणाऱ्या युनिटनुसार बील आकारून शेतकऱ्यांची पिवळणूक होत आहे. या गंभीर समस्या शेतकऱ्यांपुढे आहेत. गंभीर समस्यांमुळे शेतकरी हळूहळू संघटित होऊ लागले आहेत. त्यामुळे ऊस दरवाढ ही चळवळ होऊ लागली आहे.''[३५]

किशा हा दररोज गणपा न्हाव्याच्या दुकानात गप्पा मारण्यासाठी जात असे. असेच एकदा ते दोघे गप्पा मारत बसले असता. दोघांच्यामध्ये ऊसाच्या दराविषयी बोलणे चाललेले तेव्हा गणपाच्या मते काहीही झाले तरी ऊस पिक बंद करू नका. आज नाही तर उद्या त्यात तथ्य आहे. परंतु किशाला मात्र ते मान्य नव्हते. तो म्हणाला ''आता ऊसात तर काय ऱ्हायलंय? ऊसाचं भूस झालय समदं. सारी देणी भागवून हातात काय ऱ्हातंय? कारखाना तर ऊसाला दर कुठे देतोय बोंबलायला? औंदा न्हाई, अड्यालसाली न्हायी, त्येच्या अड्यालसाली न्हायी तर फुढलाच दर कसा मिळणार? आताच कारखानं सारं डबघाईला आल्यात. कर्जात बुडल्यात. साऱ्या गप्पा हाईत ह्या वाढीव दराच्या. गप बस उगं.''[३६] कारखाना डबघाईला आलाय कर्जात बुडालाय मग कसा वाढीव दर कारखाना देणार. कारखाना कर्जात आहे असे म्हणत्यात. हे सर्व राजकारण आहे. कारखान्याकडे पैसा नाही. कर्ज झालय. मग अधिकाऱ्यांच्या गाड्या, गेस्ट हौस मधील धंदे कसे चालतात. याला कुठून पैसे येतात. पुढच्या वर्षी ऊसाला दर मिळण्यासाठी कारखाना पैसे कोठून आणणार कारखान्याच्या अशा वागण्यामुळे कारखान्यावरचा लोकांचा विश्वास उडाला आहे.

ऊस दराचा प्रश्न आता चांगलाच रंगू लागला होता. जो तो या आगीत उडी घ्यायला तयार होता. कोणत्याही नुकसानीला सामोरे जायची प्रत्येकाची तयारी होती. संघटनेचे ऑफिस बोरीगावात होते. तिथून सर्व सुत्र हलत होती. बाहेरच्या जिल्ह्याशी, महाराष्ट्राशी तिथूनच संपर्क होतोय. तिथेच सिद्धेश्वर मंदिराच्या आवारात साठ सत्तर शेतकरी बसले होते. ते आपापसात ऊस कारखान्याला पाठवायचा का नाही या विषयी चर्चा करत होते. तेव्हा भानुसिंग म्हणाला इथे सर्वजण आपलेच लोक आहेत तेव्हा प्रत्येकाच्या मनात काही शंका असतील तर त्या बोलून दाखवा मनात ठेवू नका. याविषयी कोणालाही राग नाही. संघटनेचे काय चुकतय हे लक्षात येईल. यावर सटाले म्हणाला, ''कारखान्याला ऊस पाठवायचा नाही. पण आंदोलन लवकर मिटल नाही तर या ऊसाचे काय करायचं.'' हे सटाल्याचे मत सर्वांना पटले. यावर भानुसिंग म्हणाला, ''ऊस वाळवायचा तोडून गुराना घालायचा पण काही जरी झाले तरी कारखान्याला एक कांडही जाऊ द्यायचा नाही.'' यावर बाळा मगदूम म्हणाला, ''आमचा ऊस वाळून आमचा तोटा होऊन त्यांचे काय नुकसान होणार ते तिकडे सुकात आहेत इतक्या वर्षात त्यांनी आपले खिसे भरलेत. त्यामुळे त्याना काही सुख दुःखं नाही.'' असे प्रत्येकाने आपले मत व्यक्त करून शंकेचे निरसन केले. पण सभेत दोन मते तयार झाली. पहिले मत म्हणजे, ऊसाचे एक कांडही कारखान्याला घालायचे नाही. कोण कारखान्याला ऊस घालाय निघाला तर अडवायचा. दुसरे मत म्हणजे आधी ऊस घालायचा आणि मग कारखान्याशी भांडायचे. चेअरमनला गाठायचे. कारखाना प्रशासनाची झोप उडवायची. हे ऐकून सर्वांच्यात कुजबूज झाली. आणि सर्वानुमते निर्णय पक्का झाला काहीही झाले तरी ऊस कारखान्याला पाठवायचा नाही. आधी ऊसाला बाराशे रूपये दर लिहून घ्यायचा मग ऊस कारखान्याला पाठवायचा.

शेतकरी संघटनेची ज्याप्रमाणे तयारी जोमाने चालली होती त्याचप्रमाणे कारखाना प्रशासनाचीही तयारी जय्यत चालली होती. काहीही करून त्यांना आंदोलन बंद पाडायचे होते. कारखान्यावरती महत्वाच्या विषयाची चर्चा करण्यासाठी मीटिंग ठेवण्यात आली होती. मीटिंगला फक्त जे कारखाना प्रशासनाच्या बाजूने लोक होते तेच होते. कारण सोमवारी गळित चालू होणार होते. चेअरमन झोंबडे पाटील दोन वाजता आले आणि मीटिंग सुरू झाली. औपचारिक बोलणे त्यांनी आटोपून मुद्याकडे वळले. तेव्हा पाटील म्हणाले, ''काहीही करून शेतकऱ्यांचे मन वळवले पाहिजे. संघटनेने जे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शेतकऱ्यांना वेड लावले आहे. ते चुकीचे आहे. एवढा दर देणे कारखान्याला परवडत नाही. शेतकरी मागे हटायला तयार नाहीत. त्यामुळे सर्वांनी पुढे होऊन काम केले पाहिजे. कोणतीही कुचराई करून चालणार नाही. संचालकांनी तर कोणतेही कारण सांगू नये. धडाडीने कामाला लागावे. आज कारखान्यासमोर भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. कारखान्याच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. त्यामुळे सर्वांनी प्रयत्न करून कारखान्याचा हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' या संदर्भात झोंबडे पाटील म्हणाले, ''गेल्या सहा सात वर्षापासून साखर कारखाने संकटात आले आहेत. अठ्ठ्यांनौपर्यंत परिस्थिती बरी होती. पुढे पाकच बिघडली त्या सगळ्यांचा इतिहास उगळण्याची ही वेळ नाही. परंतु सध्या बाजारात साखरेची अवस्था काय आहे? मित्रांनो, आपण कारखान्याने तयार केलेली साखर विकून जी रक्कम जमा होते तो खर्च वजा करून शेतकऱ्यांना वाटून देतो. हिशेब केला तर साखरेची रक्कम आणि उत्पादन खर्च याचा मेळ आता बसत नाही. जसा ऊसाच्या लावणीचा खर्च वाढला तसा साखरेच्या उत्पादनाचा खर्चही वाढलेला आहे. आपल्या कार्यक्षेत्रात ऊस कमी पडतो. म्हणून पूर्ण क्षमतेनं कारखाना चालवण्यासाठी बाहेरचा ऊस आणावा लागतो. त्याच्या वाहतुकीचा खर्च वाढतो. शिवाय ऊसाची रिकव्हरी घटते आहे. त्याने आपला तोटा होतो आहे. सातत्याने अनेक वर्षे हा तोटा होतो आहे. त्यातच केंद्राने साखर धोरण बदलले, बाजारात साखर धंद्यात स्पर्धा वाढल्या. पूर्वी फ्रीसेल व लेव्ही साखरेचा रेशा ६०–४० असा होता. नव्या धोरणात तो ८०–१५ असा झाला. त्यामुळे बाजारात साखरेची किंमत घसरली या साली तर साखर गोडाऊनात पडून आहे. या साखरेचे करायचं काय? तिला किंमत नाही. साखरेचं एक पोतं तयार व्हायचं तर तोडणी अधिक वाहतूक दोनशे रूपये. नोकर, पगार, मेंटेनन्स, इंधन, कर्जव्याज, ऊसबील धरून पोत्यामागे अकराशेच्या घरात खर्च जातो. सध्याच पोत्यामागे दोन अडीचशे तोटा येतो, तर ऊसाला दर हजार अकराशे कुठून द्यायचा? एक महिना एक पोते गोडाऊनमध्ये पडून राहिले तर सोळा रूपये व्याज वाढतंय, अशी परिस्थिती आहे. साखरधंदा सध्या कधी नव्हे एवढा अडचणीत आलाय. मग इच्छा असूनसुद्धा आपल्याला दर देता येत नाही.''[३७] त्यामुळे काहीही झाले तरी गळीत सुरू झाले पाहिजे असे पाटलांचे मत आहे.

पाटलांनी कारखान्याची अवस्था सांगून कारखान्याला दर द्यायला का परवडत नाही याचे स्पष्टीकरण केले. पण खरच का कारखाना याच काटेकोर पद्धतीने चालला आहे. कोठेही गैरकारभार नाही.

### ६) साखर कारखान्यांची अवस्था :-

महाराष्ट्रात साखर कारखान्यांची संख्या खूप आहे. साखर कारखाने उभे करण्यापाठीमागे पूर्वीच्या शेतकऱ्यांचे त्यांच्या नेत्याचे. शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे उद्दिष्ट होते. साखर कारखान्यांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडली. साखर उत्पादनात देशाची प्रगती झाली. देशाला साखर उद्योगात अग्रेसर स्थान मिळवून देण्यास महाराष्ट्रातील साखर उद्योगांचा वाटा मोलाचा आहे. कारखान्यांमुळे ग्रामीण भागातील लोकांचा विकास झाला. जादूची कांडी फिरवावी तसे ग्रामीण भागचे रूपच पालटले. लोकांची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती झाली. सुरूवातीला ज्यांनी संस्था उभारल्या त्यांनी कारभार सुरळीत चालवला. सहकाराचा फायदा सर्वांना मिळावा अशी आशा होती. परंतु सर्वच चित्र पालटले. नंतरच्या नेत्यांनी चुकीच्या पद्धतीने व्यवहार चालवला. दिवसेंदिवस कारभार भ्रष्ट झाला. संस्था कर्जाच्या विळख्यात अडकल्या. ज्यांच्यासाठी या संस्था उभारल्या होत्या त्या शेतकऱ्यांची फक्त मतदान करून संचालक मंडळ निवडून दिले की नंतर पाच वर्ष ते शेतकऱ्यांना विचारत नाहीत. मनमानी कारभार करतात. पुढाऱ्यांनी आपल्या सत्ता टिकविण्यासाठी साखर कारखान्यांना राजकारणाचे अड्डे केले. कारखाना ताब्यात ठेवला की जवळच्या पंचक्रोशीतील बरेचसे मतदार ताब्यात राहतात. त्यामुळे कारखान्यांना उतरती कळा लागली आहे.

त्यामुळे साखर कारखाने भयंकर संकटात सापडले आहेत. कधी नव्हे एवढा तोटा कारखान्याला सहन करावा लागत आहे. या सर्व परिस्थितीला केंद्रसरकारचे चुकीचे धोरण जबाबदार आहे. देशात साखर साठे शिल्लक असतात. शिवाय हंगामातील साखरेची नवी भर पडत आहे. कारखान्यावर साखर ठेवायला जागा नाही. गोडाऊन भरून वाताहेत. तात्पुरती शेड उभारून उघड्यावर साखर ठेवावी लागत आहे. साखर आयात धोरण म्हणजे थट्टा आहे का? बाजारात साखरेची किंमत घसरली आहे. साखरेला उठाव नाही. त्यातच सरकार पुन्हा नवे–नवे कायदे कारखान्यावर लादत आहे.

नोकर पगार, कारखाना मेन्टेनन्स, स्टेशनरी खर्च, विविध विकास योजना, अशा लहान मोठ्या बाबींसाठी कारखान्याकडे पैसा नाही. त्यातूनही मार्ग काढून कारखाना ऊसाला योग्य भाव द्यायच्या प्रयत्नात आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी कारखान्याच्या पाठीशी उभं रहावं. संयम राखावा. साखर उद्योगच संकटात सापडल्यावर शेतकऱ्यांना ऊसाला दर कुठून द्यायचा असा प्रश्न मांडतात.

कारखान्याच्या या वागण्यामुळे शेतकरी आंदोलन करण्याच्या तयारीत होते. तेव्हा कारखान्याने सरकारपुढे गाऱ्हाणे मांडायला सुरूवात केली. कारखाना आर्थिक संकटात सापडला आहे. वैधानिक किंमत देणेही कारखान्याला परवडत नाही. इतकी वाईट परिस्थिती कारखान्याची झाली आहे. अधिकारी हे कारखान्याचे विश्वस्त आहेत. साखर कारखाना वाचला तर शेतकरी वाचेल आणि सहकारही वाचेल. कारखाना बंद पडला तर सर्वांचेच नुकसान होणार. या संदर्भात सतिश तानाजी पाटील म्हणतात, ''साखर कारखाने तोट्यात येण्यामागचे मूळ कारण साखर कारखाने हे राजकीय अड्डे झालेत अध्यक्ष व संचालक मनमानी कारभार करीत असतात. करावा लागणारा खर्च अवास्तव करतात. अध्यक्ष व संचालकांच्या राजकीय अस्तित्वासाठी अवास्तव कामगार भरतात. त्यामुळे काम कमी व कामगार जास्त झाल्यामुळे. महिन्याच्या पगारासाठी द्याव्या लागणाऱ्या खर्चात वाढ होते. कारखान्याच्या कामासाठी देण्यात येणाऱ्या वाहनांचा अधिकारी व संचालक गैरवापर करतात.''[३८]

लाखो कुटुंब या साखर व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यातली ऐंशी टक्के कुटुंब गरीब शेतकऱ्यांची, शेतमजुरांची आणि ऊस तोडणी कामगारांची आहेत. या सर्वांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आज साखरेची परिस्थिती चुकीच्या साखर धोरणामुळे बिघडली आहे. सहकार मोडीत काढायचे हे षड्यंत्र आहे. राज्याच्या तिजोरीत दरवर्षी कोट्यावधी रूपयांची भर घालणारा राज्यातला हा सर्वात मोठा व्यवसाय आहे. राज्याच्या विकासाला भक्कम आर्थिक आधार म्हणून हा व्यवसाय संपूर्ण देशात ओळखला जातो. कारखानदारी जर मोडीत निघाली तर राज्याचे आणि देशाचे नुकसान होणार आहे. या सर्व समस्यांना सामोरे जाण्यापेक्षा शेतकऱ्यांनी कारखान्याला सहकार्य केले पाहिजे. कारखाना वाचविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

फक्त शेतकऱ्यांनीच कारखाना वाचविण्यासाठी सहकार्य केले पाहिजे. चेअरमन, संचालक, अधिकारी यांची काही जबाबदारी नाही का? त्यांनी फक्त कारखान्यात भ्रष्टाचार करायचा स्वतःचे

खिसे भरायचे. वेळेवर पगार घ्यायचा. आणि पुन्हा शेतकरी दर नाही म्हणून आंदोलन करतात. म्हणून त्यांच्या नावाने ओरडत बसायचे. का तर हे शेतकरी सहकार मोडीत काढू लागलेत, समजा कारखाना अलिकडच्या काळात कर्जबाजारी झाला. डबघाईला आला, तर मग पूर्वीतरी का दर दिला नाही. कारखाना चालू झाल्यापासून कधीच ऊसाला योग्य दर मिळाला नाही. म्हणजे कारखाना कधीच व्यवस्थित चालू नव्हता का. भविष्यात तरी कधी व्यवस्थित चालेल का? आयुष्यभर ऊसाला योग्य दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांना वाटच पहावी लागणार आहे का?

**७) भ्रष्टाचार :-**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येकजण आनंदी होता. गुलामगिरीतून लोकांची सुटका होऊन स्वच्छंदी जीवन जगण्याची स्वप्ने पहात होते. स्वातंत्र्याची गोड फळे सर्वांनाच खायला मिळणार याची खात्री होती. परंतु स्वातंत्र्याच्या झाडाला फळे लागली पण ती गोड न लागता कडुझार झालीत. कारण भ्रष्टाचाराच्या वृक्षाची मुळे खोलवर रूजली आणि त्यांच्या फांद्या दूरवर फोफावल्या आहेत. त्यामुळे कोणत्याच गोष्टीत गोडवा राहिला नाही. भ्रष्टाचार हा पूर्वीपासून चालत आला नाही तर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्ता स्वतःच्या हातात आल्यानंतर तुमच्या आमच्या सारख्यांनी त्याला चार चौघात आणले आणि हा हा म्हणता तो सर्वत्र पसरला. कोणाला काही शिकवावे सांगावे लागले नाही. फक्त दुसरा काय करतोय या अनुकरणातूनच तो सर्वत्र बोकाळला. भ्रष्टाचार म्हणजे समाजातील लोकांनी व्यवस्थित चाललेल्या कारभाराचा केलेला गैरवापर होय. कोणत्याही प्रशासनात गेल्या नंतर गैरव्यवहाराशिवाय दुसरे काहीही दिसत नाही. कामाच्या बजेटवरती त्यांचे कमिशन ठरलेले असते. परवडत असेल तर द्या नाहीतर राहू द्या. ते कोणालाही भीत नाहीत. कारण त्यांना माहित असते ही साखळी वर पर्यंत जोडलेली आहे. त्यामुळे लोकांना नाईलाजास्तव ते म्हणतील ती रक्कम द्यावीच लागते. त्यांच्या या भ्रष्ट वागण्यामुळे सर्व सामान्य लोकांची कामे रखडत पडली आहेत. तसेच लोकांचा संस्थांवरचा विश्वास उडला आहे. प्रशासनाच्या अशा वागण्यामुळे संस्था खिळखिळ्या होऊन बंद पडू लागल्या आहेत. तर काही कर्जाचा डोंगर घेऊन कशातरी चालविल्या जात आहेत. हाताबोटावरती मोजण्या इतक्याच संस्थामध्ये प्रामाणिक कारभार चालला आहे.

खेड्यामधील संस्थाही अशा कारभाराना बळी पडल्या आहेत. त्यानाही आपल्या बांधवांचा फायदा तोटा पाहण्याची काळजी वाटत नाही. बोरीगावच्या विविध कार्यकारी सोसायटीचीही अशीच अवस्था आहे. सोसायटीचे चेअरमन जयसिंग अण्णा होते. भरमू हा शिपाई, रामा हा पाटकरी, तर आन्नीशा हा सेक्रेटरी आहे. सोसायटी ही बरीचवर्षे अण्णांच्याच ताब्यात होती. गावातल्या हजारभर एकर बागायतीत सोसायटीचे पाणी खेळत होते. सोसायटीच्या खालच्या मजल्यावर चार मोठे दुकान गाळे होते. खत विभाग, स्वस्त धान्य दुकान, रॉकेल डेपो, तिथे उघडले होते पहिली सात आठ वर्षे विकास कामाचे हे विभाग जोरात चाललेले. पण त्यातली धान्य, रॉकेल पुरवठा योजना लाईट गेल्यागत एकाएकी बंद पडलेला खत विभाग तेवढा सुरू होता. कारण त्यांची गरज होती व त्याला पर्यायही नव्हता. म्हणून बोरीगावची सोसायटी सहकारी तत्वावर चालणारी पाणी सोसायटी फक्त राहिली होती. बाकीच्या योजना गंगेला मिळाल्या होत्या. अण्णांनी धान्य खाऊन संपवल आणि रॉकेल पिऊन संपवल. या योजनांचा नेमका बोऱ्या कुठे वाजला हे अण्णांनाच ठाऊक. अण्णा पाणी सोसायटी तेवढी प्रामाणिक चालवत. त्यातही तक्रारी होत्या. पण अण्णा त्या तक्रारी स्वतः निपटून काढत. या संदर्भात श्रीराम गुंदेकर म्हणतात, ''पुढारी आणि अधिकारी–कर्मचारी शेतकऱ्यांनाच लुटीत आहेत. ग्रामीण योजना हडप होतात. ग्रामीण लोकांना रोजगार, स्वस्त धान्य दुकानातून धान्य, पिण्याचे पाणी मिळत नाही. न्याय करणारेच अन्याय करतात. तेथे तक्रार कोणाकडे करायची? बदलते खेडे, जगण्या मरण्याचे कोडे अशी स्थिती झाली आहे.''[३९]

भरमू हा सोसायटीचा शिपाई आहे. आन्नीशा हा सेक्रेटरी आहे. भरमू हा सोसायटीचा शिपाई असला तरी अण्णांच्याच घरची सर्व कामे करत होता. त्यांच्या ऊसाला पाणी पाजणे. पडली नडली घरची कामे करणे. अण्णांच्या सर्व सवयी त्याला माहित होत्या. अण्णा नेमके कुठे गेलेत. कुठे आहेत हे घरातील माणसांपेक्षा भरमूलाच त्यांचा पत्ता असे. अण्णांची डायरी म्हणजे भरमू. त्याची बायको सुंदरा अण्णांच्या सेवेला. खर या कामासाठी तर अण्णांनी भरमूला सोसायटीचा पगार देऊन कामाला ठेवले होते. शिपाई सोसायटीचा कामे मात्र पुढाऱ्यांची खाजगी करायची. त्या बिचाऱ्या नोकराला काय पगार मिळण्याशी मतलब. समजा एखाद्या नोकराला ते पटत नसले तरी बोलणार कुणाला या पुढाऱ्यांना बोलावे तर नोकरीपासून बाजूला व्हावे लागणार. त्यापेक्षा वाट्याला येईल ते काम करायचे

मग ते संस्थेचे असो वा पुढाऱ्यांचे खाजगीतले. महिन्याला पगार मिळाला बास यापलिकडे कोणती ही विचारपूस करायची नाही. डोळ्यावरती पट्टी बांधून मी काही पाहिले, नाही ऐकले नाही या भूमिकेतून काम करत रहायचे. या नेत्यांची वागण्याची पद्धतही कशी आहे घरच्या, जवळच्या विश्वासातील लोकांना आपल्या घरातील व्यक्ती कुठे गेली आहे. काय करते आहे हे माहित नाही. परंतू एका नोकराला मात्र त्यातील सर्व गुढ माहित असते. म्हणजे हे लोक घरातील लोकांच्या विश्वासासही पात्र नसतात. इतकी क्रुरता त्यांच्यात आलेली असते. ती कशामुळे तर लोकांच्या लुबाडून घेतलेल्या पैशाच्या धुंदीमुळे.

जयसिंग अण्णाना गावातील सोसायटीचा कंटाळा आला होता. त्याना आता सोसायटीतून बाहेर पडून महात्मा साखर कारखान्यात संचालक व्हायचे होते. त्यांची भूक वाढली होती. सोसायटी त्याना छोटी वाटू लागली होती. त्यासाठी दिवस दिवस कारखान्यावरती पडून रहात. कोणाचे सभासदाचे साखरेचे कार्ड काढून दे, कुणा शेतकऱ्याची ऊस बिलातील कपात रक्कम बँकेत जाऊन मॅनेजरला सांगून थटवून ठेऊन त्या शेतकऱ्याला हातात जादा पैसे पडतील असं बघत. अशी छोटी-छोटी कामे ते करत परंतु हिच कामे शेतकऱ्यांसाठी मोठी होती. अशा कामातून अण्णांना पुण्य मिळायचे कामाच्या निमित्ताने अधिकाऱ्यांच्या ओळखी घट्ट व्हायच्या. मग संधी साधून एखाद्या कामातून पैसे काढून त्या अधिकाऱ्यांना ओली पार्टी देत. त्यामुळे अण्णा शेतकऱ्यांच्या बरोबर, अधिकाऱ्यांच्यामध्येही प्रिय झाले होते. या सेवेचा प्रेमाचा फायदा उठविण्यासाठी ते अधिकाऱ्यांना चेअरमनपुढे आपल्या नावाची शिफारस करायला सांगत. कारण त्यांना चेअरमन पद सोडून संचालक होण्याची स्वप्ने पडू लागली होती.

कोणतेही काम करायचे झाले तर तिथे चार पैशाचे अमिष दाखविल्याशिवाय ते पटकन होत नाही. तसेच जर काम करून घ्यायला गेले तर ही मंडळी दाद देत नाहीत पुन्हा-पुन्हा हेलपाटे घालायला लावतात. त्याच कामासाठी त्याना जर नोट दिली तर दोन दिवसाचे काम दोन तासात करून देतात. या संदर्भात आनंदराव ना. शिंदे म्हणतात, ''भ्रष्टाचारांत जगातील देशामध्ये भारताचा वरचा क्रमांक आहे. भ्रष्टाचाराने देश पोखरला. लोक प्रतिनिधी, पुढारी, नेते यांना देशाची व जनहिताची जाण राहिली नाही. गोरगरीब जनतेबद्दलचे प्रेम असूया सभामंडपाच्या स्टेजपुरते मर्यादित

झाले. ओठांत एक पोटांत दुसरेच. जनता हैराण झाली आहे. सरकारी कचेऱ्यातील कामे कुणाचेतरी हात ओले केल्याशिवाय होतच नाहीत. असा अनुभव येऊ लागला. भ्रष्टाचार इतका बोकाळला की कधीही बाहेर न पडलेली स्त्री घरांतील व्यक्तिंना उपदेश करू लागली. साहेबाला पैसे दिल्याशिवाय तुमचे काम कसे होईल? हाच भ्रष्टाचाराचा पुरावा नाही का? आज कचेऱ्यातील शिपायापासून वरिष्ठांपर्यंत सर्वच भ्रष्टाचारात आकंठ बुडाले आहेत.''[४०] सर्वत्र भ्रष्टाचार फोफावला आहे. आपल्याकडे आहे तेवढ्यात समाधानी रहायला कोणी तयार नाही. आहे त्यापेक्षा जास्त मिळविण्यासाठी प्रत्येकाची हाव आहे. शेती उत्पन्नातून अशा सुख–सुविधा मिळविणे अशक्य आहे. पुढारी, पदाधिकारी, मंत्री, ऑफिसर झाले की लगेच वर्षभरात गाडी, बंगला तयार होतो. आमचा शेतकरी वर्षानुवर्षे इकडे कष्ट करीत आहे. अजूनही साधे घर बांधू शकत नाही. एवढी तफावत कशामुळे. कोणते कारण आहे यापाठीमागे. उन्हातान्हात राबणाऱ्याना जे मिळत नाही ते बंद वातानुकूलित खोल्यात बसणाऱ्यांना अलिशान गाडीतून जाणाऱ्यांना मिळते. खरे तर सरकारने या लोकांच्या संपत्तीवरती छापे घालून ती काढून घेतली पाहिजे. या संपत्तीचा वापर देशहिताच्या कामासाठी केला पाहिजे. तरच हे लोक योग्य मार्गाने चालतील अन्यथा यांना अडवणे दिवसेंदिवस अवघड होईल.

या संस्थामध्ये अधिकारीच भ्रष्ट आहेत असे नाही तर सर्वत्र शिपायापासून भ्रष्ट व्यवहार चालू आहे. शिपायानाही कमी पगार असून ते चैनीत राहतात. बोरीगावच्या सोसायटीचा पाटकरी रामा हा ही अण्णांच्या सारखा भ्रष्ट आहे. कोणी पेलाभर दारू प्यायला दिली किंवा वीस पंचवीस रूपये दिले की त्यांची गॅरेंटी नव्हती. कारण ज्याचा नंबर असेल तो बंद करून रामा लगेच पाणी तिकडे चालू करायचा.

महात्मा सहकारी साखर कारखान्यात देखील भ्रष्टाचाराची सुत्रे हलताना दिसतात. फक्त याच कारखान्याचा कारभार गैर आहे असे नाही. तर देशातील सर्वच कारखान्यांमध्ये हिच अवस्था आहे. घरोघरी मातीच्या चुली कारखान्यातील अधिकारी भ्रष्ट आहेत. गरीब शेतकऱ्यांच्या जीवावर ते चरत आहेत. खोऱ्याने पैसा ओढला जातोय. त्यामुळे कारखाना तोट्यात आहे. गरजेपेक्षा अधिक नोकर भरती केल्याने नोकर पगाराचा प्रश्न जटिल झाला आहे. साखरेचे संकट आज आहे. गेल्या तीस वर्षाच काय. कारखाना उभा राहिल्यापाससून शेतकऱ्यांच्या ऊसाला किती दर दिला आहे.

पूर्वीपासूनच कारखाना तोट्या आहे का? गेल्या कित्येक वर्षापासून कारखाना काटा मारून शेतकऱ्यांची लुबाडनूक करत आहे. संचालक मंडळ दरोडेखोरांची टोळी आहे. कारखान्याचे चेअरमनना पैसा ठेवायला जागा राहिली नाही. निवडणुकांना पैसा पुरवून आमदार खासदारांच्या आडोशानं खुर्च्या सांभाळून या सर्वांचे चरणं सुरू आहे. अधिकारी, चेअरमन इत्यादी मान्यवरांच्या भ्रष्ट वागण्यामुळे कारखाना अधिक तोट्यात आला आहे. सहकाराच्या नावाखाली चुकीचा कारभार केला जात आहे. नावासारखे कोणत्याच सभासदाला महत्व दिले जात नाही. फक्त वार्षिक सभेला अहवाल वाचून दाखविला जातो या पलिकडे सहकारी तत्वावर कोणताच कारभार चालत नाही. त्यामुळे सहकार या नावावरचा लोकांचा विश्वास उडाला आहे.

शेतकरी आंदोलनाच्यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष तानाजी शेटे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आले होते तेव्हा त्यांनी शेतकऱ्यांना केलेल्या मार्गदर्शनामधून कारखाना प्रशासन व त्यांच्या भ्रष्ट कारभाराचा पटच शेतकऱ्यांसमोर मांडला आहे. गेली तीस पस्तीस वर्ष कारखाना या प्रशासनाच्या ताब्यात आहे. तेव्हापासून ताळेबंदाच्या गप्पा ते लोकांना सांगत आहेत. कारखाना तोट्यात आहे तर मग तुमच्या गाड्या बंद करा, गेस्ट हाऊसचे धंदे बंद करा. बेहिशोबी नोकरभरती मतासाठी कारखान्याला करतात ती कोणाला विचारून करतात. कारखान्याच्या मस्टरवरती सह्या करून ही मंडळी गावातून प्रचारासाठी फिरतात. शेतकऱ्याना दमदाटी करतात. तुमच्या खुर्च्या टिकविण्यासाठी पुढाऱ्यांचे चमचे कारखान्याच्या म्हणजे शेतकऱ्यांच्या पैशावरती चैन करतात. दिवस दिवस कारखान्यावरती पडून असतात. मशिनला एक पार्ट लागला तर दहा मागवतात. साखरेच्या रिकाम्या पोत्याची किंमत बारा रूपये आहे. तर ती पंधरा रूपये लावली जाते. गेल्या कितीतरी वर्षाचा नुसत्या पोत्यांचा खर्च काढला तर कोट्यावधी रूपयांचा भ्रष्टाचार निघतो. इतर गोष्टींचा तर हिशोब बाजूलाच राहिला. आणि म्हणतात एवढा दर द्यायला परवडत नाही. कसा परवडणार प्रशासनाने जर आपल्याच बाजूला खोऱ्यांनी ओढायला सुरूवात केली तर इतरांनी असेच स्वतःच्या हितासाठी आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही. भ्रष्टाचाराची मुळे उखडून टाकण्यासाठी सर्व कारभार शुद्ध



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

करण्यासाठी प्रत्येकाने भ्रष्टाचाराला स्वतःपासून परावृत्त करण्यास सुरूवात केली पाहिजे. दुसरा काय करतोय हा विचार करण्यापेक्षा स्वतः सुधारले पाहिजे. प्रत्येकाने हे तत्व अंगीकारले तर पुन्हा पूर्ववत कारभार व्हायला वेळ लागणार नाही.

**८) व्यसनाधिनता :-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावोगावी अनेक सुख–सुविधा निर्माण झाल्या. परंतु अजूनही स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला समजला नाही. कारण अजूनही आपल्या देशात प्रचंड प्रमाणात अज्ञान, दारिद्र्य, अशिक्षित समाज, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा, व्यसनाधिनता या चक्रात सापडलेला समाज पहायला मिळतो. शेतकरी समाजाचीही अशीच अवस्था आहे. या समाजात व्यसनाधिनता हा प्रश्न गंभीर होत आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला दरिद्री जीवन असूनही ते दारू का पितात? काही वेळा तर घरात अन्नाचा कण नसतो, पोरबाळं अन्नाविना चरफडत असतात. परंतु हि मंडळी त्या दिवशी भरपूर दारू पिलेली असतात. कुठून आणतात दारू प्यायला पैसे बर पैसे आणले तर अन्ना पेक्षा, मुलाबाळांपेक्षा त्या दारूला महत्व आहे का? काय असते एवढे त्या दारूत. लोकांना ती प्यायल्याशिवाय जमत नाही. असे अनेक प्रश्न निर्माण होतात. या व्यसनामुळे अनेकांचे संसार उध्वस्त होऊन ते देशोधडीला लागलेत. याची असंख्य उदाहरणे समाजात असतानाही लोक पुन्हा त्या गोष्टीचा अवलंब का करतात. दारू पिण्यापाठीमागे अनेक कारणे आहेत. परंतु आमच्या शेतकरी समाजातील लोक दारू पितात कारण दारू पिल्यामुळे ओढवलेल्या संकटांना थोड्यावेळा पुरते का होईना विसरून त्यांचे मन शांत होते. उल्हासीत होते म्हणून लोक व्यसनाच्या आधिन होतात. हळूहळू त्यांना याची सवयच लागून जाते. व्यसन केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही. त्यामुळे आणखी दुःखे वाढवून आपल्या आयुष्याचे वाटोळे करून घेतात. संसार तर उध्वस्त होतोच. समाजात तुच्छ लेखले जाते आणि शेवटी कोणतातरी रोग होऊन मरण पावतात. म्हणूनच एकच प्याला घाली जीवनावरी घाला. एकच घोट करी जीवनाचा शेवट अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज ग्रामीण समाजात नव्हे तर सर्वत्र व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढले. आजची तरूण पिढी तर व्यसनाधिनतेच्या गर्ततेत सापडली आहे. गुटखा, तंबाखू खाणे, सिगारेट बिडी ओढणे ही आता किरकोळ व्यसने झाली आहेत. ठराविक

लोक सोडले तर बऱ्याच जणांना तंबाखू खाण्याचे व्यसन असतेच. गुटखा खाण्याचे प्रमाण तरूण पिढीत जास्त आहे. गावातील मोक्याच्या ठिकाणी गप्पा मारत बसल्यावरती मुलांचा उद्योग काय तर गुटखा खायचा. पुड्या तिथेच टाकून द्यायच्या. शहरात तर त्या कुठेही जावा सर्व रस्त्याच्या कडेला पडलेल्या असतात. आजकालच्या मुलांना तर गुटखा खाणे प्रतिष्ठेचे लक्षण वाटते. आपल्या आयुष्याला अपायकारक असणाऱ्या गोष्टीवरती आपण किती पैसे खर्च करतो याचे गांभीर्य त्याना नाही.

साखरफेरामध्ये दारिद्र्याच्या विळख्यात सापडलेले शेतकरी व्यसनाच्या आहारी गेलेले दिसतात. गुटखा खाणारी मंडळी मात्र स्वतःच्या जिभेचे चोचले भागविण्यासाठी तो खात असतात. बोरीगावच्या सोसायटीचे चेअरमन जयसिंग अण्णा सोसायटीत आले तेव्हा त्यांनी पाहिले पायऱ्यावरती सगळी घाण पडली आहे. तेव्हा ते शिपायाला ओरडले तेव्हा शिपाई म्हणाला, सकाळी झाडलेलं. हित पोर येऊन खेळत्यात माणसं बिढी ओढतात, गुटखा खातात किती झाडले तरी पुन्हा कचरा आहेच. एवढे प्रमाण बोरीगावातील लोकांचे बिडी ओढणे, गुटखा खाण्याचे वाढले होते.

आर्थिक समस्येमुळे शेतकरी खचला आहे. त्यातून कोणता मार्ग काढायचा हे त्याला सुचत नाही. त्यामुळे तो व्यसनाच्या आहारी गेला आहे. मनातील दुःखाला वाट करून देण्यासाठी तो दारूचा आधार घेऊ लागला आहे. शामा हा बोरीगावातील आर्थिक परिस्थितीने गांजलेला सर्व सामान्य व्यक्ती आहे. तो ही डोक्यातील गोंधळ काहीवेळ शांत करण्यासाठी दारू पित असतो. एकदा शामा दारूच्या दुकानात जाऊन खूप दारू पिला. त्याच्याबरोबर नामाही होता पण तो काही दारू पिला नाही. शामाला दारू इतकी झाली की तो हुंदके देऊन रडू लागला. आपली सर्व दुःखे दारूच्या नशेत मित्रांसमोर मांडू लागला. मुलीच्या बाळंतपणाला सहा हजार लागणार होते. उरलेल्या चार हजारात ऊसाची लावण कशी करायची. काय करावे हे शामाला सुचत नव्हते. दारूच्या नशेत एकदाचे सर्व दुःख त्याने मित्रांसमोर बोलून दाखविल्यामुळे त्यांचे मन थोडे हलके झाले. यावरती किशानं त्याला उपाय सुचवला. तो म्हणाला पोरीला दवाखान्यात नेल्यावरती जयसिंग अण्णांकडून बिल कमी करून घ्यायचे. ऊसाच बी, खत कारखाना उधार देते, ट्रॅक्टर भाडे, लावणी खर्च तेवढा उधार ठेवायचा. गड्यामाणसांचा पगार, बियाण्याची वाहतुक तेवढी कशी तरी द्यायची अशा पद्धतीने सर्व समस्याना मार्ग काढून दिला. त्यामुळे शामाला थोडे बरे वाटले या संदर्भात आनंद यादव म्हणतात, ''गावातील

शेतमजूरही आता पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहेत. त्यांच्यात कोठून तरी निराशा शिरलेली असते. शेती खूप पिकवूनही परावलंबी झालेला हताश शेतकरी आणि महागाईच्या चरकात पिळून निघालेला शेतमजूर दोघेही संध्याकाळी दारू गुत्यावर एकमेकाला भेटतात रस निघून गेलेल्या बगॅस पासून तयार होणारी स्वदेशी दारू रसा ऐवजी पितात आणि मेंदूला बधीर गुंगी आणतात. खेड्यापाड्यात दारूचे पीक भरपूर पिकते आहे.''[४१]

ऊस विकास योजनेचा नारळ फुटला होता. त्या योजनेच्या विकासाचा मानकरी बोरीगाव ठरणार होते. तो आनंद साजरा करण्यासाठी जयसिंग अण्णानी पार्टी ठेवली होती. त्या पार्टीत शामा, नामा, गुंडा, जयसिंग अण्णा, किशा, भरमू इत्यादी मंडळी होती. पार्टी म्हणजे फक्त जेवणच नव्हते. त्याबरोबर दारूही होती. जयसिंग अण्णा सोसायटीचे चेअरमन होते. तरीही आपला मोठेपणा विसरून दारूच्या बैठकीत आपण सर्वजण एकच आहोत. कोणी लहान मोठा नाही. या प्रेमाने बसले होते. कारण सर्वजण मित्र म्हणून बसल्यावरती दारू प्यायला जी मजा आहे ती वेगळीच. सर्वजण एकत्र बसून दारू पिऊ लागले. जणू काही त्यांचा इंद्रदरबारच भरला होता. दारूच्या नशेत जयसिंग अण्णा इंद्र, गजा हा गंधर्व, भरमू हा किन्नर, शामा–नारद, गुंडा, किशा हे भक्त देवाकडे आपले गाऱ्हाणे घेऊन आले आहेत. इंद्र देवांनी त्यांना या प्रश्नातून बाहेर काढायचे आहे. असा इंद्र दरबार रंगाला आला होता. प्रत्येकाने दारू पिली होती तरीही प्रत्येकजण अण्णांशी बोलताना अदबीनेच बोलत होता. दारू पिली असली तरी कोणाचाही तोल ढासळला नव्हता.

बिडी पिण्याचे व्यसन, शामा, किशा, गुंडा, भरमू इत्यादी सर्व मंडळींना होते. किशाला तर सर्वात जास्त बिडी पिण्याची सवय होती. बसेल तिथे बिडी काढून ओढत असे. कारण बिडी ओढताणा बिडीतील तंबाखूचा जळकट, कडवट वास, त्यांच्या मनाला खुप सूख देत असे. त्यामुळे त्याच्या शरीरात एक वेगळीच संवेदना जागी होऊन मन प्रसन्न होत असे. किशाच्या बिडी ओढण्याच्या विषयी मोहन पाटील म्हणतात, ''डोकं चढल्यावर वैतागून तो खिशातली बिडी ओढणार. ती उलट–सुलट फुंकून काडी पेटवून बोटाच्या कात्रीत धरून एक खच्चून झुरका ओढणार. मग तोंडातनं हळूहळू धूर सोडत डोकं हलकं करणार. बिडीच्या निळसर धुरात त्याला हत्ती–घोडे–रथ दिसायचे. मन लावून बिडी ओढत बसला की त्या तोंडावरही कधी कधी उल्हासी दिसायची.''[४२]

शामा, किशा हे या व्यसनाधिनतेचे बळी नव्हे काय! म्हणूनच व्यसनाधिनतेपोटी हे ग्रामीण भागातील लोक आपले आरोग्य बिघडवून घेतात व आपल्या जीवाला, संसाराला, मुलाबाळांच्या प्रेमाला मुकतात. आपल्या दारिद्र्यासारखीच ही व्यसनाधिनता या लोकांना चिकटून बसली आहे आणि अंधाराच्या खोल काळोखात त्यांना ओढून नेत आहेत. जिथे कोणत्याच प्रश्नाचे उत्तर सापडत नाही.

**९) अंधश्रद्धा :-**

शेतकरी हा ग्रामीण समाजात राहणारा असल्यामुळे परंपरेने चालणारे सर्व रीतिरिवाज, सणवार, जत्रा, रूढी परंपरा, तो वेळोवेळी करत असे. आपण जर हे कार्यक्रम केले नाहीत तर आपल्यावरती अनिष्ट ओढवेल अशी त्याला भीती असते त्यामुळे तो वर्षभराचे सर्व उत्सव उत्साहाने पार पाडत असे. एखाद्या वेळेस त्यांच्याकडे पैसे नसले तरी ते कोणाकडून तरी उसने घेऊन काहीतरी करून तो त्यादिवशी कार्यक्रम करीत असे. कारण या सर्वांवर त्यांचा विश्वास होता. तसेच ग्रामीण समाजात प्रचलित असलेले भूतबाधा, चेटूक, भविष्य सांगणे, स्वप्न पडणे, नजर लागणे या गोष्टींवरतीही तो विश्वास ठेवत असे. अशाच अंधश्रद्धांचे सणवारांचे पालन 'साखरफेरा' मध्ये केलेले दिसते.

किशाच्या ऊसाच्या फडाला आग लागल्यापासून तो अस्वस्थ होता. नवीन लागण करायची त्याची धडपड होती, स्वप्न होते. परंतु भांडवलाअभावी ते पूर्ण होऊ शकत नव्हते. त्यामुळे वारंवार त्याला वेगवेगळी स्वप्न पडत होती. त्यात त्याला पांढरे उंदिर, आंबील, जत्रा, आंबील जत्रेत सजवलेले गाढव, सासणकाठी एवढा उंच ऊस अशा गोष्टी त्याला स्वप्नात दिसायच्या. त्यामुळे तो झोपेतच या स्वप्नामध्ये काहीतरी बडबडत असे. तसेच ऊस जळल्यापासून त्याचं वागणही विचित्र झालेले होते. दिवसभर रानात राबणारा गडी रानात न जाता बिड्या फुकत कुठेतरी बसून रहात असे. अंगणात तासन्तास बसे, मध्येच चटकन उठून बाहेर जाणे, त्याचे कशातच लक्ष लागत नव्हते. कोणाच्याही नादाला न लागणारे काम एके काम करणारा नवरा असा वागू लागल्यामुळे बायजा काळजीत पडली होती. तिला आपल्या नवऱ्या विषयी काळजी वाटू लागली होती. तिच्या मनात

वेगवेगळे विचार येत होते. परिस्थितीने हे विचार तिच्या मनात घर करत होते. अनेक शंकांनी तिच मन पोखरून निघत होते. बायजेला आपल्या नवऱ्याविषयी वाटते, ''आपला नवरा शेताभाताकडं आधीसारखं ध्यान देत न्हायी. ती गोष्ट एखादवेळी समजून घेता येईल. पण हल्ली त्याचं कशात लक्ष नसतंय त्याचा पाय थाऱ्यावर रहात नाही. सारखा हिंडत असतोय. त्याला लागीर झालं असलं? त्येच्यावर कुणी देवर्षी घातला असंल? तिला काही उलगडा होईना. तो असा गप् गप् का बसतोय? का कुणी करणी केली त्येच्यावर?''[४३] बायजा ही ग्रामीण भागातील असल्यामुळे तिथले रितीरिवाज श्रद्धा, अंधश्रद्धा या सर्वांचे संस्कार तिच्यावरती झाले होते. ती शिकलेली नसल्यामुळे या गोष्टीचा उलगडा ती योग्य पद्धतीने न करता तिच्याच पद्धतीने करते. ग्रामीण भागातील झालेल्या संस्काराप्रमाणे तिच्या मनात चांगले विचार न येता भूत-खेतं, करणी, लागीर देवर्षी घालणे अशा अंधश्रद्धा युक्त गोष्टीच येतात. आणि आपल्या नवऱ्याला असेच कुणीतरी काहीतरी केले असावे असे तिला वाटते. यामुळे आता आपले चांगले काही होणार नाही वाटोळेच होणार या विचाराने दुःखी होते आणि रडत बसते.

पूर्वी समाजाची विशिष्ट अशी रचना होती. त्यापद्धतीनेच लोक वागत असत. नियमांचे कोणी उल्लंघन करत नसे. शेतकरी हा प्रमुख असून बलुतेदार आणि अलुतेदार अशी विभागणी केली होती. प्रत्येकाची कामे प्रत्येकाला ठरवून दिली जात होती. त्यांनी तोच व्यवसाय करायचा त्याचप्रमाणे कुडमुडे जोशी यांचा समावेश अलुतेदारांमध्ये केला जातो. त्यांचा भविष्य सांगणे हा व्यवसाय असे. शंभो महादेव, जोतिबा, आई भवानी च्या नावानं असं नामस्मरण तो करीत कुडुंम... कुडुंम... किंड्...कुडाक्...कुडाक् असं वाजवत गुणगुणत तो घरोघरी फिरत असे. प्रत्येकाच्या घरी जाऊन त्यांचे भविष्य सांगत असे. त्यामध्ये एखादी बाधा असेल तर त्यावरती उपाय देखील तोच सांगत असे आणि शेवटी उठताना काहीतरी कारण सांगून लोकांना भावनेत पकडत असे. आधिच भविष्य सांगून ते लोक निम्मे भावनिक झालेले असतात. आणि जाताना या देवाला निघालो, या देवाला प्रसाद चढवायचा आहे. इकडची यात्रा आहे. अशी अनेक कारणे सांगून लोकांकडून पैसे उकळतात. ती व्यक्ती पैसे नाहीत म्हटली तर कपडालत्ता मागतात, कपडालत्ता नसला तर भाकरी मागतात म्हणजे फुल ना फुलाची पाकळी तरी घेतल्या शिवाय ते रिकामे जात नाहीत. लोकही त्या कुडमुडे जोशीच्या

भूलथापांना भूलतात आणि काहीना काही त्याला देतात. कारण त्या जोश्याने त्यांना आशेची किरण दाखवलेली असते. त्यामुळे त्याचे मन, शरीर उल्हासीत झालेले असते. सर्वाचांच विश्वास या ज्योतिष्यावरती होता तेवढा बायजाचा नाही तिच्या मते, ''त्यो काय देव हाय व्हय? भविष्य सांगायला म्या सारं ऐकलंय पर्तेक माणसाची नुकसानी होत असती. जलम हाय ह्यो. त्यात चढ उतार हाय. ते सांगाय देवरूषि कशाला पायजे आपल्याला कळंना?''[४४] जोतिषांना जर संपूर्ण भविष्य कळत असते तर ते असे दारोदार भविष्य सांगत भिक्षा मागत फिरत बसले असते का? त्यांचा स्वतःचाच ठावठिकाणा कुठे नसतो त्याना खरचं भविष्य कळत असतं तर त्यांनी स्वतःचाच आधी उद्धार केला असता मग दुसऱ्याना सांगितले असते. याना स्वतःचेच काही माहित नाही तर दुसऱ्याच्या नशिबातील काय सांगणार पोटासाठी पत्करलेला हा व्यवसाय आहे तो त्यांच्याकडे परंपरेने चालत आलेला असतो आणि आपल्यासारखे लोक मात्र त्यांच्या गोडगप्पांना फसतात. त्यांच्या नादी लागतात. कारण ते आतून कुठेतरी दुखावलेले असतात. त्यांना नवीन स्वप्ने दाखविण्याचे काम हे जोशी करतात. त्यामुळे लोक त्यांच्यावरती खूष असतात. कोणाला काय सांगायचे याचा अंदाज त्यांना बरोबर आलेला असतो. लोकांच्यामते आज नाही तर उद्या का होईना जोश्याचे म्हणणे खरे होईल आणि आपण सुखी होऊ या आशेने ते उत्साही असतात.

पूर्वी पासून अनेक गोष्टी रूढी-परंपरेने अंधश्रद्धेतून चालत आलेल्या आहेत. त्यावरती लोकांचा विश्वासही असतो. त्यातीलच एक घटक म्हणजे स्वप्न पडणे. स्वप्न कधी पडले, कोणत्या वेळी पडले, स्वप्नात कोण-कोण आले होते. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्याचा अर्थ लावला जात असे व त्यावर भविष्यकाळातील घडणाऱ्या घटनांचा संदर्भ लावला जात असे. तसेच स्वप्न साखरफेरामध्ये किशाला पडले होते. त्याच्या स्वप्नामध्ये माळावरती दोन माणसे पेव उकरत होते. उकरताना खण् खण् असा आवाज झाला. त्या गड्यांनी पेवावरचे दगडाचे झाकण बाजूला सारले. पेवात बघितले तर पेव साखरेनी गच्च भरलेले. एवढ्यात पेवातनं टुण्णकन उंदीर बाहेर पडले. ते सरळ माळावरच त्यांनी वाट धरली. माळावरतीच त्यांची सभा भरली. त्या गर्दीत मोठ्या आवाजात एक उंदीर म्हणाला, ''या माळाचं काय करायचं? एवढ्यात आकाशातून मोठा आवाज काढून कोण म्हणालं माळाचं सोनं करा, पांढरं सोनं'' हे ऐकून किशाला फरांडे बाबाची भाकणूक ऐकायला येऊ लागली. माळाच सोनं हुईल, पांढरं धान मायंदाळ पिकल, ऊसाचं भूस होईल.

भाकणूक संपली माळभर भंडारा उधळला. एवढ्यात कानावर तडाम् तडाम् आवाज पडला. पाहिलं तर माळावर आंबीलजत्रा भरलेली. बॅन्ड, बाजाच्या सुरात सजवलेले गाढव, पाटील, बलुतेदार, गावातील सर्व बायका माणसे, बायका मातीच्यास घागरीत आंबील घेऊन नटूनथटून चाललेल्या. जत्रा येऊन थांबली. पाटील पुढ झाले त्यांनी गाढवाचे पूजन करू लागले तसे गाढव लाथा झिंजाडत पळू लागले. एवढ्यात एक म्हातारा म्हणाला या वर्षी गाढव ज्या बाजूला पळाले तिकडे भरपूर पाऊस पडणार. बायकांनी आंबील वाटले, सर्वजण प्याले. तसे पाटील ओरडले उठा आता फिरा माघारी. सगळेजण आले त्याच तालासुरात माघे फिरलीत. या घोळक्यात एक ताडमाड उंचगडी लहान मुलाला खांद्यावरती घेऊन चालत होता. त्या मुलाने वडिलांना विचारले या गाढवाचे पुजन का केले यावर त्याच्या वडिलांनी गाढवाच्या पुजनाची बोधकथा सांगितली. चालून चालून सर्वजण थकले होते. किशालाही चालणे अशक्य झालेले त्यामुळे त्यान एका बाईकडची आंबील भरलेली घागर घेतली आणि घटाघटा प्यायला लागला. एकाएकी त्याला आंबीलाच्या जागी ऊसाचा रसच दिसू लागला. घागरभर रस त्याने घटाघटा पिऊन टाकला. त्याला रसाची गुंगी येऊ लागली. काही केलेतरी डोळे उघडेनात. शेवटी लोकांनी खांद्यावरून उचलून त्याला घरी नेऊन झोपवले. एकाएकी झोपेतून किशा दचकून जागा झाला तर त्याला स्वप्नातील काहीच आठवत नव्हते फक्त पांढरे उंदीरच त्याला दिसत होते.

असेच एके दिवशी पुन्हा एकदा त्याला स्वप्न पडले त्या स्वप्नामध्ये त्याला ऊस दिसला हा ऊस ज्योतिबाच्या सासणकाठीएवढा उंच होता. तो माणसासारखा किशाबरोबर बोलत होता. त्यांचे बोलणे खूप वेळ चाललेले. एवढ्यात त्याला जाग आली तर सकाळचं ऊन सोप्याच्या दारातून आत आलेले अंथरूनाची घडी घालत स्वतःशीच हसत म्हणाला, ''आयला काय सपान म्हणायचं, ऊस किती दांडगा हुता. काय चिन्हं दावत असंल हे? ''[४५] यावर बायजा म्हणते तुम्हाला लाटंच्या अण्णा डॉक्टरला दाखवून शेक देऊन आणाय पाहिजे. कारण तुम्हाला वेड लागले आहे. पण किशाला वाटत होते ऊस स्वप्नात आला आहे म्हणजे काही ना काही तरी चांगले घडणार पण बायजाला मात्र आपला नवरा वेडा झाला आहे असे वाटत होते.

पुन्हा एके दिवशी किशाला त्या पांढऱ्या उंदरांच स्वप्न पडलं. उंदीर किशाचे घोंगडे ओढू लागलेत. त्याच्याकडे बघून चित्कारू लागलीत. घोंगड्यात सगळे उंदीरच. पांढरे शुभ्र

उंदीर आणि त्यांचे लालभडक मण्यासारखे डोळे चमकत होते. किशानं घोंगडं टाकल तसं उंदरांनी ते ओढून अंगणात नेलं. आणि ते कुरतडायला सुरूवात केली. मग किशाने त्यांना मारायला काठी हातात घेतली तसं आंबील जत्रेतल सजलेले गाढव दिसले. किशाने तीच काठी गाढवाला मारली, तसे ते ओरडत पळत सुटले. एवढ्यात पाऊस पडू लागला. घोंगडं ओलं झालं. पाऊसामुळे उंदीर बिळात जाऊन बसले. किशान घोंगड उचलून पाहिल तर जागोजागी त्याला बिळ पडली होती. तसच पिळून त्याने ते पांघरून घेतले व बिळात तोंड घालून बसलेल्या उंदरांना शिव्या देवू लागला. थोड्याच वेळात पाऊस थांबला अंगणातील पाणी आटले, उन्हाने जमीन तापू लागली तसे पांढरे उंदीर पुन्हा बाहेर पडू लागले. त्यांनी किशावर चाल केली तशी किशाने त्यांच्यावर विळाच उगरला. किशाने उगारलेल्या विळ्याची धार त्यांना सहन होईना त्यामुळे ते घाबरून पुन्हा बिळात गेले.

किशाला पडलेले पांढऱ्या उंदरांचे स्वप्न हे खरोखरच विचित्र होते. या स्वप्नाचा किशाने काय अर्थ लावला असेल हे शेवटी त्याचे त्यालाच ठाऊक. पांढरे उंदीर हे त्याच्या चांगल्यासाठी होते का? वाईटावरती याचेही गुढ उकलले नाही. पांढरे उंदीर त्याच्या स्वप्नात आल्यानंतर तो त्यांच्यावर खूप चिडत असे. मात्र ऊस त्याच्या स्वप्नात आल्यावर त्याच्याशी तो गप्पा मारे, मिठ्या मारे. तेव्हा तो खूप आनंदी असे. जणू काही प्रत्यक्षातच ऊस त्याच्याशी गप्पा मारतोय. तसेच फरांडे बाबांनी ऊसाची भविष्य काळातील सांगितलेली अवस्था ऐकून तो दुःखी होतो. पाऊस पडावा म्हणून गाढवाला सजवून त्याची पूजा करायची हि घटनाही वेगळीच वाटते परंतू अशा गोष्टी परंपरेने चालत आलेल्या असतात. त्यामुळे त्या गावोगावी वेगवेगळ्या पद्धतीने अवलंबविल्या जातात. त्यापाठीमागील खरे खोटेपणा जाणण्याचा प्रयत्न कोणी करत नाही. जे आहे तसेच पुढे चालवत नेणे एवढेच उद्दिष्ट असते. अशाप्रकारे मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीत मांडलेल्या मुद्यांवरून त्यांचे शेतकऱ्यांविषयीचे प्रेम, सहानुभूती, व्यक्त होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला योग्य न्याय मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी संघटित व्हावे असे मोलाचे मार्गदर्शन करून संघटनेची ताकद किती जबरदस्त आहे. याचे चित्रण केल्यामुळे लोकांना संघटनेचे महत्व लक्षात येते. तसेच किशाला पडत असलेले स्वप्नही विचित्र होते.

******

# संदर्भ


१) चवरे आर. व्ही. – बळीराजा, कृषिविज्ञान प्रकाशन पुणे, जून २००७, अंक सहावा, पृ. १५

२) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ७

३) प्रा. डॉ. सुरेश साळुंखे – बळीराजा, कृषिविज्ञान प्रकाशन पुणे, नोव्हेंबर २००६ अंक – ११, पृ. ९१

४) नागनाथ कोतापल्ले – ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १०६

५) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ४१

६) क्षितीज पाटुकले – बळीराजा, कृषिविज्ञान प्रकाशन पुणे, नोव्हेंबर २००६, पृ. २२

७) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ४१

८) आनंद यादव – ग्रामसंस्कृती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. जाने २०००, पृ. २६

९) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १४

१०) नितीन गजाननराव देशपांडे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ४७

११) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १८

१२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १९

१३) तानाजी राऊ पाटील – मराठी कादंबरी : समिक्षा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र. आ., पृ. १७४

१४) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १९१

१५) प्रा. चंद्रकांत खंडागळे – ग्रामीण समाजशास्त्र, सौ. मायावती खंडागळे, सांगली, प्र. आ. ऑक्टो २००५, पृ. ५०

१६) तत्रैव – ग्रामीण समाजशास्त्र, सौ. मायावती खंडागळे, सांगली, ऑक्टो २००५, पृ. २०४

१७) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १९६

१८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १९६

१९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १९९

२०) मोहन धारिया – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जून २००७, पृ. ३४

२१) प्र. बा. भोसले – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ८६

२२) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १३१

२३) नितीन देशपांडे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ४८

२४) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १७५–१७६

२५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १७७

२६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १७९

२७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १८९

२८) नागनाथ कोतापल्ले – ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. १९३

२९) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ११२

३०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. २१९

३१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ३८

३२) आनंद यादव – ग्रामसंस्कृती, मेहता पब्लिकेशन, पुणे प्र. आ. जाने. २०००, पृ. ३१

३३) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ४०

३४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १०१

३५) सतिश तानाजी पाटील – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ४८

३६) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ७

३७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. १७१–१७२

३८) सतिश तानाजी पाटील – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. ४८

३९) श्रीराम गुंदेकर – ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्र. आ., पृ. ३८

४०) आनंदराव ना. शिंदे – बळीराजा, कृषि विज्ञान प्रकाशन, पुणे जुलै २००७, पृ. १२



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४१) आनंद यादव – ग्रामसंस्कृती, मेहता पब्लिकेशन, पुणे, प्र. आ. जाने. २०००, पृ. १३०

४२) मोहन पाटील – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ३६

४३) तत्रैव –साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ६०

४४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ९९

४५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. २००६, पृ. ५८

*******